बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.८नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक९२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

झेडपीतले घोटाळेबाज!

आंधळे ताकाला जावून लपवू लागले भांडे!!

तक्रारदार ठोठावणार न्यायालयाचे दार



परिक्षण न करताच, ५४ कोटींची विल्हेवाट?

संगिता पाटील, मुकुंद आंधळेंची केली तक्रार

५४ कोटींच्या निधी देयकात कोण-कोण सहभागी?

...तर तत्कालीन सीईओंवर प्रकरण शेकणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत, ग्रामिण पाणी पुरवठा योजनेकरिता जिल्ह्यात विविध ठिकाणी तब्बल ५४ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. परंतू योजनेतील मंजूर कामांची ५ टक्के तपासणी न करताच तत्कालीन सीईओ संगिता पाटील यांच्या स्वाक्षरीने अभियंता मुकुंद आंधळे, ५४ कोटींचे बिले अदा करणार आहेत. त्यामुळे सदरील बिले पाणी पुरवठा योजनांची चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत देण्यात येवू नयेत. असे निवेदन जिल्हा परिषद सीईओंना देण्यात आले आहे. त्यामुळे घोटाळेबाजांचे धाबे दणाणले आहेत. हा सर्व प्रकार आंधळे उघड्या डोळ्यांनी करु लागले आहेत. त्यामुळे बिले देयक प्रकरण आता चांगलेच शेकणार आहे.

ग्रामिण भागातील पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी विविध योजना कार्यान्वित आहेत.परंतू त्या योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील परिणामी पाणी प्रश्न सुटण्याऐवजी आणखीन कठीण होतो आहे. त्याला संबंधित यंत्रणा एकमेव जबाबदार आहे. कारण ज्या गुत्तेदाराला योजनेचे काम दिले आहे, त्याने सदरील काम पूर्ण केले आहे का? याची पाहणी करुन बिले अदा केली जातात. असे असतांना बीड जिल्हा परिषदच्या तत्कालीन सीईओ संगिता पाटील यांनी मंजुरी दिलेल्या कामांची पाहणी न करताच बिले वाटपाच्या फाईलवर स्वाक्षरी केल्या आहेत. तक्रार दाराने असे म्हंटले आहे की, पाणी पुरवठा अंतर्गत कोणत्याही योजनेचे तीन वेळा तांत्रिक परीक्षण होणे अपेक्षित आहे. मात्र अभियंता मुकुंद आंधळे यांनी, एकही योजनेच्या कामाचे ५ टक्के परिक्षण केलेले नाही. त्यामध्ये तत्कालीन सीईओ संगिता पाटील यांचा देखील सहभाग आहे. त्यामुळे एकाही कामाचे बील अदा करण्यात येवू नये, अशी तक्रार जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना देण्यात आली आहे.

तक्रार दाराने निवेदनात नमूद केले आहे की, यापूर्वी देखील आपण ५४ कोटी रुपयांच्या निधी संदर्भात काही बाबी उघड केलेल्या आहेत. परंतू योजनेतील दोषींवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे ५४ कोटी रुपयांच्या निधी घोटाळ्यात अनेकजन सहभागी असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सखोल चौकशी करुन दोषींवर योग्य ती, कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रार दाराने केली आहे. त्यामुळे घोटाळे बाजांचे धाबे दणाणले आहेत.

सीईओ आदित्य जीवणेंकडून न्यायाची अपेक्षा

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, यांच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. कारण त्यांची काम करण्याची पद्धत नेहमीच न्यायिक राहिलेली आहे.५४ कोटी देयक संदर्भात नेमकी काय कारवाई करतात याकडे जिल्ह्याची लक्ष लागले आहे.

बापरे राज्यात सर्वात जास्त खर्च

कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे यांनी केलेल्या योजनांचा खर्च राज्यात सर्वात जास्त असून यामध्ये त्रयस्थ तांत्रिक परीक्षा न करताच तो केला आहे. त्यामध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता पाटील व कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे यांचा हा प्रकार आहे. शासनाची दिशाभूल करून कंत्राटदारांच्या हितासाठी पाच टक्के परीक्षण न करताच देयके अदा केलेली आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाला आहे.त्यामुळे चौकशी समिती नेमून तात्काळ कारवाई करावी अन्यथा याबाबत न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

तत्कालीन सीईओ अन् अभियंता भलतेच करामती?

शासकीय योजनांची अंमलबजावणी करत असताना ती काटेकोरपणे करावी लागते. शासनाने लावून दिलेले निकष आणि अटी यांचे उल्लंघन करता येत नाही. खरंतर पाणीपुरवठा योजनांच्या मंजूर कामांचे तांत्रिक परीक्षण शासकीय यंत्रणांकडून होणे अपेक्षित आहे. मात्र खाजगी संस्थांमार्फत तांत्रिक परीक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे या योजनेत घोटाळा झाल्याचे एक प्रकारे सिद्ध होते. असा सवाल तक्रारदाराने उपस्थित केला आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे यांची, तातडीने बदली होणे अपेक्षित आहे. कारण संबंधित विभागात वरिष्ठ आणि अनुभवी अधिकारी असताना आंधळे यांना कार्यकारी अभियंता पदाचा पदभार चुकीच्या पद्धतीने दिला गेला आहे. तो पदभार सीईओ आदित्य जीवने यांनी तात्काळ काढून घ्यावा.कारण त्यांच्या कार्यपद्धतीत अनियमितता आढळून येते.

-मुकुंद धुताडमल

ट्रम्प यांचा विजय होताच एलॉन मस्क मालामाल

देशविदेश:एका दिवसांत केली २६ अब्ज डॉलर्सची कमाई

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचे नेते डोनाल्ड ट्रम्प यांचा राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजय होताच त्यांचे खंदे समर्थक असलेल्या एलॉन मस्क यांच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. मस्क यांची संपत्ती एका दिवसात २६.५ अब्ज डॉलर्सनी वाढली आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेले एलॉन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना निवडणुकीत जाहीर पाठिंबा दिला होता. मस्क यांनी ट्रम्प यांच्या प्रचारासाठी १३० दशलक्ष डॉलर्सची देणगी दिली होती. तसेच एक्स या प्लॅटफॉर्मवर ट्रम्प यांना पाठिंबा दिला होता. ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकाच्या माहितीनुसार, एलॉन मस्क यांच्या संपत्तीत वाढ होऊन निवडणुकीच्या निकालानंतर ती २९० अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे.मस्क यांच्या टेस्ला या कंपनीच्या शेअरमध्ये १५ टक्क्यांची वाढ झाली. टेस्लाचे शेअर वर्षभरापासून तेजीत आहेत. मागच्या वर्षीय टेस्लाच्या शेअरमध्ये ३२ टक्क्यांची वाढ झाली होती. डोनाल्ड ट्रम्प यांना राष्ट्राध्यक्षपदासाठी

पान २ वर...

वकिलाकडून न्यायमूर्तीवर अपमानास्पद टिप्पणी

निर्णय: उच्च न्यायालयाने सुनावली शिक्षा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली उच्च न्यायालयाने एका वकिलाला अवमान केल्याप्रकरणी दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. एका प्रकरणावरील सुनावणी दरम्यान चॅट बॉक्सवर अवमानकारक टिप्पणी केल्याने न्यायालयाचा अवमान केल्याच्या आरोपाखाली उच्च न्यायालयाने एका वकिलाला चार महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायमूर्ती प्रतिभा एम सिंग आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या खंडपीठाने ही शिक्षा सुनावली.या प्रकरणात खंडपीठाने म्हटलं की, वकिलाने केलेल्या टिप्पण्या न्यायिक अधिकारी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि न्यायालयाचा स्पष्टपणे अवमान करणाऱ्या आहेत. त्यामुळे अपमानास्पद भाषा वापरल्याप्रकरणी वकिलाला दोषी ठरवलं जात आहे. त्यांनी संपूर्ण न्यायव्यवस्थेचा

पान २ वर...

नांदेडमध्ये प्रा.लक्ष्मण हाकेंचे वाहन फोडले

नांदेड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ओबीसी आरक्षण आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांच्या वाहनाची काच दगडफेक करून फोडण्यात आली. ही घटना लोहा मतदारसंघातील कंधार तालुक्यातील बाचोटी येथे गुरुवारी रात्री घडली. मराठा तरुणांनी प्रा. हाके यांचे वाहन फोडल्याचा आरोप असून, घटनेनंतर मराठा व ओबीसी असे दोन गट आमनेसामने आल्याने गावात प्रचंड तणाव निर्माण झाला.प्रा. हाके यांनी ओबीसी कार्यकर्त्यांसह घटनास्थळी ठिय्या मांडला. या वेळी 'एकच पर्व ओबीसी सर्व' अशी जोरदार घोषणाबाजी केली. प्रा. हाके यांनी दगडफेक करणाऱ्यांनी समोर येऊन लढण्याचे आव्हान दिले. सध्या बाचोटी येथे पोलीस बंदोबस्त तैनात आहे.

सराईत गुन्हेगाराला घेतले ताब्यात!

मोहीम: केज पोलीस स्टेशनची कामगिरी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिनांक ०७/११/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना गुप्त बातमीदारां मार्फत माहिती मिळाली की, इसम नामे जुबेर मुस्ताक फारोखी याचे जवळ गावठी कट्टा असुन तो त्याचा धाक दाखवुन रोजा मोहल्ला भागात दहशत माजवत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी पोलीस स्टाफला सोबत घेवुन रोजा मोहल्ला येथे गेले असता

पान २ वर...

गोंधळ भर सभेत म्हणाले 'तुतारी' वाजवा

बंडखोर धोंडे चक्क स्वतःचं चिन्ह विसरले!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे देशाचं लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत होत आहे. सध्या राज्यभरात सर्व पक्षांच्या नेत्यांच्या सभा सुरु आहेत. असं असलं तरी या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीतील काही नेत्यांनी उमेदवारी न मिळाल्यामुळे बंडखोरी करत निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील भाजपाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांचाही समावेश आहे. ते आष्टी विधानसभा मतदारसंघामधून अपक्ष निवडणूक लढवत आहेत.

माजी आमदार भीमराव धोंडे हे आष्टी विधानसभा मतदारसंघामधून निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात महायुतीकडून भारतीय जनता पक्षाचे नेते सुरेश धस आणि महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते मेहबूब शेख हे निवडणुकीच्या मैदानात आहेत. त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. त्यामुळे या ठिकाणी चांगलंच राजकारण तापलं आहे. तीनही नेत्यांकडून प्रचाराच्या सभांचा धडाका सुरु आहे. पण असं असतानाच भीमराव धोंडे यांनी एका सभेत बोलताना केलेल्या एका आवाहनामुळे राजकीय वर्तुळात

पान २ वर...

नेमकी काय घडलं?

आष्टी विधानसभा मतदारसंघातील एका सभेत भीमराव धोंडे बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, आता निवडणुकीच्या प्रचारासाठी आणखी १५ दिवस राहिले आहेत. त्यामुळे गावागावात फेऱ्या काढायच्या आणि कसल्याही परिस्थितीत आपल्याला तुतारी वाजवायची म्हणजे वाजवायची, असं म्हणताच सभेत मोठा हशा पिकला. मात्र, आधी नेमकं काय झालं हे त्यांच्या लक्षात आलं नाही. पण सभेत बसलेल्या काही लोकांनी त्यांची चूक लक्षात आणून दिली. त्यानंतर आपण चूकन बोललो, चूकन बोललो, असं म्हणत त्यांनी सारवासारव केली. त्यानंतर ते पुढे म्हणाले, येथे तुतारी काय वाजत नाही. मी जरी बोललो असतो ना? तरी तुतारी तुम्ही वाजवणार नाहीत. मात्र, आपली शिट्टी वाजवा, असं भीमराव धोंडे यांनी म्हटलं आहे.

जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आमदार भिडले

चर्चेतले: कलम ३७० च्या मुद्द्यावरुन घमासान!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

सहा वर्षांनंतर स्थापन झालेल्या जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आज खडाजंगी झाली. कलम ३७० पुन्हा लागू करण्याची मागणी अपक्ष आमदार शेख खुर्शीद यांनी केली. हातात फलक घेऊन ते विधानसभेत आल्याने गदारोळ झाला. या फलकाला भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन निषेध नोंदवला. तर या दरम्यान दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये हातापायीही झाली. खासदार इंजिनिअर रशिद यांचे बंधू अपक्ष आमदार खुर्शीद शेख कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याच्या मागणीसाठी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये आले. खुर्शीद यांच्याकडून

पान २ वर...

तो परत आलाय

व्यक्ती असो वा व्यक्तींचा समाज; चांगल्याची अपेक्षा असलेल्याकडून अपेक्षाभंग झाला की पुढची संधी वाईटास द्यावी असे बहुसंख्यांस वाटते. अमेरिकेतील ताज्या निवडणूक निकालातून या सत्याची प्रचीती यावी. बेभरवशी ट्रम्प यांचा पराभव करून अध्यक्षपद मिळवणारे जो बायडेन यांचा गेल्या चार वर्षांतील कारभार अगदीच फिका होता; हे खरे. देशांतर्गत पातळीवर आणि जागतिक पातळीवरही ते अत्यंत निष्प्रभ ठरले, हेही खरे. एकमेव जागतिक महासत्तेचा हा प्रमुख रशिया–युक्रेन आणि इस्रायल–हमास युद्ध रोखू शकला नाही, हे खरे नाही असे कोण म्हणेल? बायडेन यांची शेवटची दोन वर्षे अगदीच केविलवाणी गेली, हे तर खरेच खरे. या काळात त्यांची काही कृती, स्मरणात राहण्याऐवजी बायडेन यांची विस्मरणशीलताच अधिक स्मरणीय ठरली. त्यातूनच या जरठाने अध्यक्षपदाच्या शर्यतीत पुन्हा राहावे की न राहावे याचा घोळ घातला गेला आणि डेमॉक्रॅटिक पक्षाच्या धुरीणांनी अखेर हात धरून बायडेनबाबांस खाली बसवले. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात अखेर कमला हॅरिस यांचा प्रवेश झाला. कमलाबाईंनी सुरुवात तर मोठी झकास केली. चर्चेच्या दोन फेऱ्यांत त्यांनी डोनाल्डदादांस चांगलेच उघडे पाडले. ट्रम्प यांची बौद्धिक पोकळी किती खोल आहे याचे त्यांनी थेट प्रक्षेपण करवले. पण नंतर झालेला हल्ला आणि त्यानंतरचे ध्रुवीकरण हे या सगळ्यापेक्षा अधिक प्रभावी ठरले आणि जगातील या सर्वात श्रीमंत देशाने राजकीय/ सामाजिक/ सांस्कृतिक/ लैंगिक आदी आघाड्यांवर आपली वैयक्तिक दिवाळखोरी प्रदर्शित करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांच्या पारड्यात आपली मते घातली. चांगल्या गणल्या गेलेल्याकडून अपेक्षाभंग झालेल्या अमेरिकनांनी बऱ्या मानल्या जात होत्या अशा कमला हॅरिस यांस संधी देऊन अपेक्षाभंगाचा आणखी एक धोका टाळला आणि अखेर कायद्याने गुन्हेगार ठरलेल्या वाईटाच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. जे झाले ते झाले. आता पुढे काय याचा विचार करणे आवश्यक.

कारण आपली विजयी प्रतिक्रिया व्यक्त करताना ट्रम्प यांनी केलेले भाष्य या भविष्यात काय वाढून ठेवलेले आहे याची चुणूक दाखवून देते. अद्याप विजयावर शिक्कामोर्तबही झालेले नाही, तरीही ट्रम्पतात्यांनी देशाच्या सीमा कुलूपबंद करण्याचा निर्णय जाहीर केला. अलीकडेच दर काही मिनिटांस अमेरिकेत घुसू पाहणाऱ्यांमध्ये भारतीय कसे सर्वाधिक आहेत याचा तपशील जाहीर झाला. या भारतीयांवरही ‘दिसता क्षणी गोळ्या घालण्याचा’ आदेश ट्रम्प पुढील काळात देणारच नाहीत असे नाही. अमेरिकेच्या महासत्तापदापर्यंतच्या प्रवासात त्या देशातील स्थलांतरितांचा वाटा मोठा आहे. किंबहुना अमेरिकेस अमेरिकापण मिळाले तेच मुळी स्थलांतरितांमुळे. ट्रम्प यावर नियंत्रण आणू पाहतात. म्हणजे लवकरच भारतीय तरुणांस दिल्या जाणाऱ्या ‘एचवनबी’ व्हिसा संख्येलाही कात्री लागल्यास त्याची तयारी आपण ठेवायला हवी. अमेरिकेतील हे स्थलांतरित स्थानिकांची कुत्री–मांजरे मारून खातात अशी फक्त आणि फक्त ट्रम्प यांच्याच मुखी शोभेल अशी लोणकढी ट्रम्प यांनी हाणली आणि अमेरिकनांनी ती गोड मानून घेतली. ‘सुज्ञ की सैतान’ या संपादकीयात (४ नोव्हेंबर) ‘लोकसत्ता’ने या निवडणुकीतील प्रचार आणि बदलत्या वाऱ्यांचा वेध घेतला होता. त्यात व्यक्त करण्यात आलेली भीती अखेर खरी ठरली आणि अमेरिकनांनी सैतान–वृत्तीस संधी दिली. वाह्यातवृत्तीबाबत ट्रम्प परवडले असे त्यांचे उपाध्यक्षपदाचे साथीदार जेडी व्हान्स आहेत. धर्मांधता ते पुरुषसत्ताकवृत्ती या दोन्हीत ट्रम्प यांना झाकावे आणि व्हान्स यांना काढावे इतके तोडीसतोड ते. प्रचाराच्या काळात अध्यक्षीय प्रतिस्पर्धी कमला हॅरिस यांच्याविषयी लालूप्रसादही वापरणार नाहीत अशी वंगाळ भाषा त्यांनी वापरली. या व्हान्स यांची अर्धांगिनी भारतीय आहे आणि ट्रम्प यांची पत्नी युगोस्लाव्हियन. आणि हे दोघेही आता स्थलांतरितांविरोधात भूमिका घेणार. ट्रम्प अध्यक्षपदी आल्याने काय उत्पात होऊ शकतो हा प्रश्न येथेच संपणारा नाही.त्याची व्याप्ती खुद्द ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात दाखवून दिली. ‘‘नरेंद्र मोदी हे आपले मित्र खरे’’ असे म्हणत त्यांनी भारत हा अमेरिकी उत्पादनांवर सर्वाधिक कर आकारणारा देश आहे असे विधान केले आणि या देशास ‘जशास तसे’ उत्तर दिले जाईल असा इशारा त्यांनी दिला. या व्यापारसंरक्षणवादी भूमिकेच्या अनुषंगाने त्यांनी भारताची तुलना चीनशी केली. चीन हा अमेरिकी उत्पादनांवर २०० टक्के कर आकारतो; पण या आघाडीवर भारत हा ‘कर–राजा’ आहे, असे ट्रम्प म्हणाले. तेव्हा ट्रम्प यांच्याशी आपल्या नेत्यांचा असलेला कथित दोस्ताना प्रत्यक्षात किती कामी येणार, याचा अंदाज बांधलेला बरा. तसेच ‘‘भारत–अमेरिका संबंध म्हणजे लोकशाहीची जननी आणि सर्वात श्रीमंत लोकशाही देशांचा बंध’’ असली पोपटपंचीही फारशी उपयोगी ठरण्याची शक्यता नाही. हे फक्त भारताबाबतच घडण्याचा धोका आहे, असे नाही.

प्रयत्न केला तरी ते वाकडेच राहणार!



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

२०२४ अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक ही अमेरिकेचा ४७ वा राष्ट्राध्यक्ष निवडण्यासाठीची निवडणूक होती . यात रिपब्लिकन पक्षाच्या डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय झाला.या निवडणुकांत कोणत्याही पक्षास उमेदवार उभे करण्यास मुभा असली तरी मुख्यत्वे लढत डेमॉक्रॅटिक पक्ष आणि रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांत खरी लढत होती. रिपब्लिकन पक्षाकडून माजी राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प पुन्हा मैदानात उभे होते.तर डेमोक्रॅटिक पक्षाकडून वर्तमान राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन उमेदवार होते मात्र २१ जुलै, २०२४ रोजी त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी उमेदवारी जाहीर केली. त्याला डेमोक्रॅटिक पक्षाने पाठिंबा दिला. रिपब्लिकन पक्ष आणि डोनाल्ड ट्रम्प पुन्हा सत्तेवर आले. रिपब्लिकन पक्ष हा अमेरिकेतील दोन महत्त्वाच्या राजकीय पक्षांपैकी एक पक्ष आहे . नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पक्षाने अध्यक्षपद मिळवले.आपल्या आर्थिक व सामाजिक भूमिकांमुळे रिपब्लिकन पक्ष अमेरिकन राजकारणात उजवीकडे झुकणारा पक्ष मानला जातो.२०२० सालीच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेच्या मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आणि ज्यो बायडेन यांना अध्यक्षपदी बसवले.खर तर ज्यो बायडेन यांच्या पूर्वी म्हणजे २०१७ च्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना अध्यक्षपदी निवडून दिले.नंतरच्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प आणि ज्यो बायडेन यांच्यात अध्यक्षीय निवडणूक झाली.आता डोनाल्ड ट्रम्प यांचे संकुचित धोरण न पटल्यामुळे त्यांच्या जागी ज्यो बायडेन यांना संधी दिली ते संधीच सोनं करतील म्हणून त्यांना अध्यक्षपदी बसवले खरे पण डेमोक्रॅटिक पक्षाच्या आणि अमेरिकेच्या धोरणात ना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिणाम दिसून आला. त्यामुळे तळ्यात मळ्यात करणार्या मतदारांनी पुन्हा डोनाल्ड ट्रम्प यांना संधी दिली. विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर झालेला गोळीबार हा मुद्दा ही निवडणुकीत महत्वाचा ठरला गेला. खर तर डेमोक्रॅटिक पक्षाने कमला हॅरिस यांना २०२० च्या निवडणुकीत उमेदवारी दिली असती तर सलग डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष राहिला असता ही शक्यता नाकारता येत नाही. स्वतः ला सांभाळत न येणारा राष्ट्राध्यक्ष असेल तर महासत्तेच वलय राहिलं?हे गेल्या चार वर्षांत मतदारांनी अनुभवलं आहे. आधीच डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष करून चार वर्षे चाचपडत गेली.त्यामुळे पुढची चार वर्षे अशीच चाचपडत घालावण्यापेक्षा संकुचित धोरण आपल्या तरी देशासाठी वाव मिळेल.हा विचार मतदारांनी केला असावा. अन्यथा कमला हॅरिस यांची विजयाची वाटचाल सुरवातीच्या टप्प्यातच दिसू लागली.पण, मतदारांनी पुन्हा रिस्क कशाला म्हणून पुन्हा डोनाल्ड कार्ड खेळल्याच दिसतं. डोनाल्ड ट्रम्प यांची भुमिका भलेही कुणाला पटणारी नसेल पण अमेरिकनांना ती पटणार नाही असे नसावे. सुधारणावादी विचारांपेक्षा मतदारांनी पुन्हा पुरातनवादी विचारधारा स्विकारली आहे.पुराणमतवादामध्ये पुरातन काळापासून चालत आलेल्या पारंपरिक प्रथा व संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांना संधी दिली आहे. ह्याउलट उदारमतवादामध्ये नवे विचार व संकल्पनांचा स्वीकार मतदारांनी नाकारला आहे .याला कारण डेमोक्रॅटिक पक्षाने निवडलेल्या बायडेन उमेदवार केले यांच्यावर रोष मतदारांचा होता.आजवरचे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षांची आजच्या सारखी संकुचित भुमिका राहिलेली नाही. हे विशेष सांगता येईल.पण, काही ना काही खुबी या रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदी राहिलेल्या व्यक्तीस आहे.अब्राहम लिंकन, रिचर्ड निक्सन,जेराल्ड फोर्ड, वॉरेन हार्डिंग यांसारख्यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ अमेरिकेलाही वेगळी ओळख करून गेला.आजवरचे रिपब्लिकन अध्यक्ष

अब्राहम लिंकन,युलिसिस एस. ग्रँट ,रदरफोर्ड बी. हेस, जेम्स गारफील्ड,चेस्टर ए. आर्थर, बेंजामिन हॅरिसन,विल्यम मॅककिन्ली,थियोडोर रूझवेल्ट, विल्यम हॉवार्ड टाफ्ट,वॉरेन हार्डिंग,कॅल्विन कूलिज,हर्बर्ट हूवर, ड्वाइट डी. आयझेनहॉवर, रिचर्ड निक्सन, जेराल्ड फोर्ड , रॉनल्ड रेगन,जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश, जॉर्ज डब्ल्यू. बुश, डोनाल्ड ट्रम्प आणि आता विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प . अमेरिका फर्स्ट हे धोरण सुरवातीला राहिलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचे कायम राहील हे अमेरिका म्हणून ठिक पण महासत्ता म्हणून जगातील युद्ध मानसिकता, जागाची आर्थिक चिंताजनक परिस्थिती, जागतिक तापमानवाढ याचे काय? डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्याचा आनंद पुराणमतवादी विचारांच्या राष्ट्रांना होईल.अमेरिकेला इतिहास घडवण्याची संधी चालून आली होती. कारण, पहिली महिला उदारमतवादी विचारसरणी निवडता आली असती.ती पुन्हा येईल सांगता येणार नाही.हे ही तितकेच खरे होते.डोनाल्ड ट्रम्प यांची भुमिका बदलते की,शेवटी शेपूट कितीही सरळ करण्याचा प्रयत्न केला तरी ते वाकडेच राहणार .

पान एक वरून

ट्रम्प यांचा विजय

मस्क यांनी पाठिंबा दिला असल्यामुळे पुढील पाच वर्ष मस्क यांचा धोरणांवर प्रभाव असेल असा अंदाच व्यक्त करून गुंतवणूकदार टेस्लामध्ये गुंतवणूक करत आहेत.

ट्रम्प यांच्या विजयामुळे श्रीमंत आणखी श्रीमंत! : ट्रम्प यांच्या विजयामुळे फक्त मस्क यांच्याच संपत्तीत वाढ झाली असे नाही. तर जगातील सर्वात श्रीमंत १० व्यक्तींच्या संपत्तीतही वाढ झाल्याचे दिसले. ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकाच्या माहितीनुसार ट्रम्प यांच्या विजयानंतर जगातील श्रीमंत सर्वात १० श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत ६३.५ अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे. मस्क यांच्याबरोबर मेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस, ऑरॅकलचे लॅरी एलिसन यांना सर्वाधिक लाभ झाला आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये पहिल्या स्थानावर एलॉन मस्क, दुसऱ्या स्थानावर जेफ बेझोस तर तिसऱ्या स्थानावर एलिसन आहेत.

वकिलाकडून न्यायमूर्तींवर अपमानास्पद

अनादर केला असून त्यांनी कोणतीही माफी मागितलेली नाही. तसेच त्यांचं हे संपूर्ण वर्तन हे न्यायालयाची बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. हे वर्तन तिरस्काराच्या बाजूने दिसून येत असून वकील म्हणून पात्र असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून असा प्रकार होता कामा नये, असं खंडपीठाने स्पष्ट केलं. यासंदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. तसेच खंडपीठाने असंही स्पष्ट केलं की, वकिलाने या प्रकरणी माफी देखील मागितली नाही किंवा त्यांच्या वर्तनाबद्दल त्यांना कोणताही पश्चाताप दिसत नाही. त्यामुळे वरील बाबी पाहता या न्यायालयाचे न्यायिक अधिकारी, पोलीस अधिकारी आणि न्यायाधीश यांच्या विरोधात ३० ते ४० तक्रारी दाखल केल्याने त्यांचा हेतू न्यायालयाची बदनामी करण्याचा आहे हे स्पष्ट होते, असं स्पष्ट करत वकिलाच्या शिक्षेला स्थगिती देण्यास खंडपीठाने नकार दिला.दरम्यान, मे महिन्यात न्यायाधीशांनी वकिलाविरुद्ध स्वतःहून फौजदारी अवमान खटला सुरू केला होता. कारण वकिलाने न्यायाधीशांवर वैयक्तिक टीका केली होती. तसेच न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान चॅट बॉक्समध्ये अपमानास्पद टिप्पण्या केल्या होत्या. खंडपीठाने सांगितले की, वकिलाने न्यायिक अधिकारी आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि पोलिस अधिकाऱ्यांवर बदनामीकारक आरोप केले. या सर्व बाबी लक्षात घेऊन खंडपीठाने वकिलाला चार महिन्यांचा कारावास आणि दोन रुपये दंडही ठोठावला. तसेच त्याला कोठडीत कारागृहात पाठवण्याचे निर्देशही पोलिसांना दिले.

सराईत गुन्हेगाराला घेतले

पोलीसांना पाहुन इसम नामे जुबेर मुस्ताक फारोखी पळु लागला तेंव्हा पोलीसांनी त्याचा पाठलाग करुन त्यास बसस्टँडच्या मागे पकडले असता त्याचे अंगझडती मध्ये त्याचे कमरेला एक सिल्वर रंगाचा देशी बनावटीचा गावठी कट्टा, त्याचे मॅगझीन मध्ये ०१ जिवंत काडतुस मिळुन आल्याने सदर इसम नामे जुबेर मुस्ताक फारोखी, वय २७ वर्षे, रा. रोजा मोहल्ला केज, ता केज याचे विरुध्द पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन आर्म अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही ही मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक, बीड, मा.श्रीमती. चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोह/बाळासाहेब अहंकारे, पोअं/ प्रकाश मुंडे यांचे पथकाने केली आहे. सदर आरोपीवर यापुर्वी सुध्दा पोलीस स्टेशन केज येथे बरेच गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करीत आहेत.

बंडखोर धोंडे चक्क स्वतःचं

चांगलीच चर्चा रंगली आहे. झालं असं की, भीमराव धोंडे हे एका सभेत बोलत असताना चक्क आपलं शिट्टी हे चिन्हच विसरले आणि त्यांनी तुतारी वाजविण्याचं आवाहन केलं. त्यांच्या या विधानामुळे भर सभेत मोठा हशा पिकला. पण चूक लक्षात येताच त्यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, भीमराव धोंडे यांनी अनेक वर्ष भारतीय जनता पक्षात काम केलं आहे. ते भाजपाचे माजी आमदार देखील आहेत. मात्र, यावेळी राज्याच्या राजकारणात बदलेल्या समीकरणाच्या युती आणि आघाडीच्या राजकारणाचा फटका अनेकांना बसला. कारण अनेकजण उमेदवारीसाठी इच्छुक असतानाही पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. आता आष्टी विधानसभा मतदारसंघात यावेळी भारतीय जनता पक्षाकडून सुरेश धस यांना उमेदवारी मिळाली. त्यामुळे माजी आमदार भीमराव धोंडे हे अपक्ष निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. पण गेली अनेक वर्ष भाजपात राहिल्यामुळे या वर्षीच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारी केल्यामुळे भीमराव धोंडे यांना आपलं निवडणुकीचं चिन्ह (शिट्टी) नेमकं कोणतं? हे लक्षात राहिलं नाही आणि त्यांनी भर सभेत ‘तुतारी’ वाजविण्याचं आवाहन केलं. दरम्यान, भीमराव धोंडे यांनी केलेल्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्कही लावले जात आहेत. भीमराव धोंडे यांनी हे विधान चुकून केलं की मुद्दाम केलं? असे प्रश्नही आता आष्टी विधानसभा मतदारसंघात अनेकांनी उपस्थित केले आहेत.

जम्मू काश्मीरच्या विधानसभेत

बॅनर काढून घेण्याच्या प्रयत्नात भाजपा आमदारांनीही वेलमध्ये धडक दिल्याने बाचाबाची झाली. सज्जाद लोन, वाहिद पारा आणि काही नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनीही खुर्शीद यांना समर्थन दिले. त्यामुळे भाजपाचे आमदार इतर आमदारांबरोबर भिडले. विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांच्या निर्देशनानुसार तीन आमदारांना वेलमधून बाहेर काढण्यात आले. जम्मू–काश्मीरला पूर्वीप्रमाणे विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या ठरावावरून विधानसभेत बुधवारी जोरदार खडाजंगी झाली. अतिशय गोंधळात पूर्वीप्रमाणे जम्मू–काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा ठराव चर्चेविना मंजूर करण्यात आला. मात्र, भाजपा सदस्यांनी या वेळी गोंधळ घालून ठरावाच्या प्रती सभागृहात फाडून टाकल्या आणि अध्यक्षांविरोधात घोषणाबाजी केली. बुधवारी वादळी चर्चा झाल्यानंतर आज (७ नोव्हेंबर, गुरुवार) पुन्हा भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन गोंधळ घातला.

ठरावात नेमकं काय? : विधानसभेत हाणामारी सुरू असतानाच पीडीपीच्या वाहिद पारा, फयाज मीर आणि पिपल्स कॉन्फरन्सचे सज्जाद गनी लोन यांनी विशेष दर्जा बहाल करण्याच्या मागणीसाठी आणखी एक ठराव मांडला. या ठरावावर शेख खुर्शीद यांचीही स्वाक्षरी आहे. हे सभागृह स्पष्टपणे कलम ३७० आणि कलम ३५ ए त्यांच्या मूळ, अपरिवर्तित स्वरूपात त्वरित पुनर्संचयित करण्याची मागणी करते आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ द्वारे लागू केलेले सर्व बदल मागे घेण्याची मागणी करते. आम्ही भारत सरकारला विनंती करतो की या कायद्याचा आदर करावा. जम्मू आणि काश्मीरची वेगळी ओळख, संस्कृती आणि राजकीय स्वायत्तता जपण्याच्या उद्देशाने सर्व विशेष तरतुदी आणि हमी पुनर्संचयित करा, असं या ठरावात नमूद होतं.

पान सहा वरून

राडी जिल्हा परिषद

शेख, संदिपान कांबळे, काशिनाथ वाघमारे, अमर कोळगिरे, सिद्धेश्वर कोळगिरे, त्याचबरोबर मुढेगाव येथे लक्ष्मण बापू जगताप, विलास जगताप, प्रवीण जगताप, बाळू तात्या जगताप, राडी तांडा येथे रावसाहेब आडे यांच्यासह काशिनाथ आडे, काशिनाथ राठोड, तसेच सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक येथे आबासाहेब पांडे, मेघराज सोमवंशी, विश्वास पाटील, तुषार फुलाने, प्रशांत चिवडे, सुधाकर काळुंखे, विनोद भारती, बिबीशन चिवडे, श्रीकांत सोमवंशी, नवनाथ हातांगळे, नवनाथ काळुंके, रामराव मुळे, तडोळा येथे वसंतराव कदम, बिभीषण कदम, एकनाथ कातळे, अकोला येथे सुदाम आगळे, श्रीनिवास आगळे, वसंतराव आगळे, भारत आगळे, भारत बरकते, गुणवंत आगळे, राखी अंधारे, सुदाम आगळे, यांसह गावागावातील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनतेशी जोडलेली

मात्र पक्षाच्या मतात विभाजन होऊन नुकसान होऊ नये यासाठी त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. मात्र जनतेशी जुळलेली नाळ कायम ठेवण्यासाठी ते राजकीय, सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. गुरुवारी संपर्क कार्यालयात भेटीसाठी आलेल्या सर्व अभ्यागतांशी त्यांनी मुक्त चर्चा करत सर्वांशी संवाद साधला.

चिंचोलीमाळीत शिव

कोटूळे यांचे, १३ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य संभाजी महाराज कदम यांचे कीर्तन होणार आहे. त्याचबरोबर १२ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजता संगीत भजन व भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. तर १३ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता पालखी व दिंडी मिरवणूक काढून या सोहळ्याची सांगता होणार आहे.

कड्यात पिकपला, अपघात

सुमारास (एम एच १६ ए वाय ९३४९) असा क्रमांक असलेला पिकप नगरला कांद्याच्या गोण्या खाली करून कड्याकडे येत असताना सकाळी आठच्या दरम्यान या रस्त्याच्या अर्धवट कामामुळे पिकप चालकाचे वाहनावरील नियंत्रण ढळल्याने या वाहनाला अपघात झाला. या अपघातात सुदैवाने पिकप चालक शहादेव सदाशिव आढाव (रा. मातकुळी ता.आष्टी) हे किरकोळ जखमी झाला आहे. मागील दोन वर्षापासून साबलखेड– चिंचपूर या रस्ता चौपदरीकरणाचे काम केवळ अधिका–यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे कासव गतीने चालू आहे. या अर्धवट कामामुळे अनेकदा लहान –मोठ्या वाहनांना अपघात होऊन अनेकजण जखमी झालेत, तर काहींना जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरीकांतून होत आहे.

लोणार येथे शिवसेना

आपसात मतभेद विसरून २० तारखेला महायुतीचे उमेदवार आमदार डॉक्टर संजय रायमुलकर यांना मतदान करून प्रचंड बहुमताने विजयी करा नाना प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार डॉक्टर संजय रायमुलकर यांनी मेकर लोणार मतदारसंघात विकासासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून हजारो कोटी रुपये मंजूर करून आणले आणि सगळे काम मार्गी लावले परंतु येणाऱ्या काळात परंतु येणाऱ्या काळात जिथे नाराजी आहे तिथे सर्व कामे मार्गी लावतील आमदार नव्हे तर आपल्या हक्काचा माणूस म्हणून कोणत्याही अफवांना बळी न पडता आमदार यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख बळीरामजी मापारी यांनी केले यावेळी महायुतीचे सर्व तालुकाप्रमुख शहरप्रमुख सरपंच उपसरपंच शाखाप्रमुख उपप्रमुख सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठे संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेकडून कार्यकर्तृत्वाची

संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे ,शिवसेना सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे व तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या उपस्थितीत तानाजी धस यांची शिवसेना उपतालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली यानिवडीने येणाऱ्या काळात केज तालुक्यात शिवसेना वाढीसाठी प्रयत्न करणार असे तानाजी धस यांनी सांगितले.

व्हिजन, नसलेल्या संगिता

आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे पत्र संगिता ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, दिलीप काळे, दिपक शिंदे यांच्यासह संगिताताई ठोंबरे यांचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

आदित्य शिक्षण संस्थेत

या स्पर्धेत विद्यापीठाच्या अंतर्गत येणारे कृषी संलग्न सर्व महाविद्यालयाचे खो–खो संघ सहभागी होणार आहे. परभणी कृषी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संघ या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होतात. ही स्पर्धा कृषी संलग्न शिक्षण घेणाऱ्या खेळाडूंसाठी मोठे व्यासपीठ आहे.या स्पर्धेत उत्कृष्ट खेळणाऱ्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड होणार आहे. सदरील स्पर्धेचे नियोजन आदित्य कृषी अभियांत्रिक, अन्न तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांनी केलेले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

मातीचे आरोग्य आणि हिरवळीचे खत

हिरवळीचे खत

हिरवळीच्या खतांचे प्रकार

हिरवळीच्या खतांचे दोन प्रकार आहेत .

शेतात लगवड करून घेण्यात येणारी हिरवळीची खते : हिरवळीच्या खतांचे पीक शेतात सलग, मिश्र किंवा एखाद्या पिकांमध्ये आंतरपीक म्हणून पेरतात व त्याच शेतात ते पीक फुलो-यावर येण्यापूर्वी शेतात नागंरून मिसळतात. या प्रकारच्या हिरवळीच्या खतामध्ये ताग, गवार, चवळी, धैंचा, मूग, मटकी, मेथी, लाख, मसूर, वाटाणा, उडीद, कुळीथ, सेंजी, शेवरी, लसुणघास, या पिकांचा समावेश असतो.

हिरव्या कोवळया पानांचे हिरवळीचे खत : पडीक जमिनीवर अथवा जंगलात वाढणा-या वनस्पतीची कोवळी हिरवी पाने आणि फांद्या गोळा करून शेतात गाडणे अथवा पडीक जमिनीवर किंवा शेताच्या बांधावर हिरवळीच्या झाडांची लगवड करून त्याचा पाला आणि कोवळया फांद्या शेतात पसरवून नांगरणीच्या अथवा चिखलणीच्या वेळी मातीत मिसळणे होय. हिरवळीच्या खतासाठी गिरिपुष्प, शेवरी, करंज, सुबाभुळ, टाकळा, कणिऱ्या, किंजळ यांची झाडे व झुडपे पडीक जमिनीत वाळवून त्यांच्या हिरव्या पानांचा व कोवळया फांद्याचा हिरवळीच्या खतासाठी वापर करतात

हिरवळीच्या खतांसाठी योग्य असलेली पिके

धैंचा

हिरळीचे खत तयार करण्यासाठी ताग व चवळी नंतर हे तिसरे महत्त्वाचे पीक आहे. हे पीक अनुकूल परिस्थिती नसतानाही उत्तम वाढते. ज्या जमिनी जास्त क्षारयुक्त किंवा ओलावा धरून ठेवतात अशा जमिनीत देखील हे पीक जोमाने वाढते व याचे उत्तम प्रकारचे हिरवळीचे खत तयार होते.ढेंचामुळे भरपुर कॅलशियम उपलब्ध होतो. त्यामुळे जमिन चिबड करणारे व पाण्यात न विरघळणारे सोडीयमचे क्षार द्राव्य अवस्थेत येऊन पावसाचे व ओलीताचे पाण्याद्वारे त्यांचा निचरा होऊन अशा जमिनीची सुपिकता वाढते. होतात. ढेंचामुळे पिकांच्या मुळावर आक्रमण करणारे सुत्रकृमी व अनेक प्रकारच्या तणांचा नाश होतो. ढेंचा व्दिदलवगिऱ्य पिक असल्याने वातावरणातील नत्र जमिनीत साठवुन ठेवण्यास मदत करते. हयापासुन प्रति एकर ३५ किलो नत्र (७५ किलो युरीयी एवढा) पिकास मिळतो ढेंचामुळे पुढील पिकास प्रति एकर ३५ किलो नत्र, ७.३ किलो मॅग्रेशियम ही अन्नद्रव्ये उपलब्धढेंचामुळे जमिनीची ओल टिकवुन ठेवण्याची क्षमता वाढते. ढेंचामुळे जास्त पावसाने होणारी जमिनीची धुप (धुप म्हणजे सकस माती वाहुन जाणे) कमी प्रमाणात होते.

ताग

जमिनीचे एक प्रकारचे पुनःरूज्जीवन करण्याकरिता आपल्या देशामध्ये ताग मोठ्या प्रमाणावर पेरतात. मान्सूनच्या पावसावर तयार होणारे हे पीक आहे. हे पीक फारच झपाट्याने वाढते. १ ते २ मीटर उंच वाढण्यासाठी जास्तीत जास्त ६ ते ८ आठवड्यांचा कालावधी पुरेसा होतो. जमिनीत ओलावा भरपूर असल्यास हे पीक लवकर कुजते.

चवळी

चवळी, कुलथी, जंगली इंडिगो आणि तूर ह्याही पिकांचा थोड्या फार प्रमाणात हिरवळीच्या खतांसाठी वापर होतो. ही पिके द्विदल व दाळवर्गीय असल्याने यांच्या मुळांवर गाठी असतात व त्यामुळे नत्र स्थिरीकरण चांगले होते.

लवकर वाढणाऱ्या पिकांची निवड करून, त्यांची दाट पेरणी करून पीक फुलोऱ्यावर येण्याच्या आधी ते नांगराच्या सहाय्याने जमिनीत गाडतात. त्यापासून जमिनीला नत्र मिळते, जमिनीचा पोत सुधारतो व ती सुपीक बनते. अशा खतांना हिरवळीचे खत म्हणतात. जमिनीचा पोत टिकविण्यासाठी व पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी हिरवळीच्या खताला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. दिवसेंदिवस रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ होत आहे. रासायनिक खतांच्या अवाजवी व अयोग्य वापरामुळे जमिनीची सुपिकता व उत्पादनक्षमता बिघडली आहे. अशा परिस्थितीत जमिनीची सेंद्रिय खताची गरज भागवावयाची असेल तर हिरवळीची खते हा योग्य पर्याय आहे.

गवार

गवार ह्या डाळवर्गीय पिकाच्या खतापासून पिकांच्या मुळावरील गाठीतील जीवाणू वातावरणातील नत्राचे रूपांतर दुसऱ्या स्वरूपात करून तो इतर पिकांना उपलब्ध करून देण्याचे काम करते. तसेच हिरवळीच्या खताने जमिनीमधील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते.

गिरीपुष्प

गिरीपुष्प हे एक अत्यंत उपयुक्त हिरवळीचे खत असून ते एक मध्यम आकाराचे झाड आहे. ते कोणत्याही प्रकारच्या जमिनीमध्ये तसेच निरनिराळया पर्जन्यमानाच्या प्रदेशात चांगल्या प्रकारे येऊ शकते. सेंद्रिय खतांच्या वाढत्या किमती लक्षात घेऊन या झाडाची डोंगर उतारावर, पडीक जमिनीत, शेताच्या बांधावर लागवड केल्यास हिरवळीचे पर्यायी खत मोठया प्रमाणावर उपलब्ध होऊ शकते.त्याची वाढ खूप झपाट्याने होते. ताग व धंच्याच्या तुलनेत या झाडाच्या पानामध्ये सर्वाधिक म्हणजे २.९ टक्के नत्र असते.

सेंजी

रब्बी हंगामासाठी हे उपयुक्त हिरवळीचे खत आहे . सिचनाची सोय असलेल्या ठिकाणी हेक्टरी ३०-४० किलो बियाण्याचा वापर करून पेरणी करावी .जानेवारीच्या अखेरीस जमिनीत गाडण्यास ते योग्य होते.उसाच्या पिकास ते योग्य हिरवळीचे खत आहे .

द्विदल कडधान्याची पिके

पावसाळयाच्या सुरुवातीस शेत तयार करून मूग, उडीद, कुळीथ यांचे बियाणे शेतात पेरले असता या द्विदल वर्गीय पिकांचा हिरवळीच्या खतासी चांगला उपयोग होतो जमिनीची पुर्व मशागत केल्यावर मूग,उडीद, कुळीथ यासाठी २५ ते ३० कि .ग्रॅं. प्रति हेक्टरी बियाणे पेरावे पेरणीपुर्वी बियाण्यास राय़झबियम जीवाणु चोळूण आवश्यकतेनुसार पाण्याच्या पाळया द्याव्यात. पीक फुलो-यावर येण्यापुर्वी नांगरणी करून जमिनीत गाडले असता यापासून प्रति हेक्टरी ५० ते ६० कि .ग्रॅं .नत्र पिकास उपल्ब्ध होतो.

हिरवळीचे खत तयार करण्याची पद्धत

हिरवळीच्या खत पिकांपासून जास्तीत जास्त फायदा करून घ्यावयाचा असल्यास पीक पेरण्यापासून ते जमिनीमध्ये गाडेपर्यंत ज्या निरनिराळ्या मशागती कराव्या लागतात, त्याबाबतची संपुर्ण माहिती असणे आवश्यक आहे. कारण यावरच पुढील पिक चांगले येणेअवलंबून असते.

हिरवळीच्या खत पिकांची पेरणी अशावेळी केली पाहिजे की ते पिक जमिनीत दाबल्यावर कुजून जाऊन पुढील पिकाला त्यापासून जास्तीत जास्त फायद होईल. पिकाची प्रेरणी व जमिनीत दाबणी अशावेळी व्हावयास हवी की जेणेकरून हिरवळीच्या खतापासून मिळणारी मुलद्रव्ये जमिनीतून निचऱ्याद्वारे अथवा अन्य कारणांनी निघून जाणार नाहीत, तसेच हिरवळीच्या खत पिकांची कुजण्याचीही क्रिया होईल. हिरवळीचे खत चांगले होण्यासाठी फोकावयाचे वा पेरावयाचे बी जर्मिनेटर व प्रोटेक्टंटच्या द्रावणामध्ये प्रक्रिया करून वापरावे म्हणजे उगवण व वाढ लवकर एकसारखी होते. कल्पतरू एकरी १०० किलो वापरावे.

निरनिराळ्या हंगामातील पिकांचे हिरवळीचे खत करण्याच्या वेळी हिरवळीचे पीक फुलो-यावर आलेले असावे. ही पिके ६ ते ८ आठवड्यात फुलो-यावर येतात. ही पिके ज्या शेतात घेतली असतील त्याचे खत तयार करावे. या हिरवळीच्या पिकांची पाने बाहेरून आणतात ती जमिनीवर पसरवून नांगरामागे टाकून गाडावीत. ट्रायकोडरमा चा उपयोग केल्यास ह्या खताची प्रत वाढविता येईल.

नुकत्याच फूलो-यात आलेले हिरवळीच्या पिकांची जमिनीलगत कापणी करावी. कापलेले हिरवळीचे पीक शेतात लोखंडी नागंराने तास घेउन नागंराच्या प्रत्येक सरीमध्ये उपलब्ध प्रमाणात टाकावे. नंतर नागंराच्या दुसऱ्या तासाच्या वेळी अन्यथा धानाच्या चिखलणीच्या वेळी संपूर्ण गाडले जाईल याची काळजी घ्यावी. हिरवळीचे पीक जमिनीत गाडून झाल्यावर वरुन फळी किंवा मैद फिरवावा. त्यामुळे जमिनीत गाडलेले सेंद्रिय पदार्थ पूर्णपणे झाकले अथवा दाबले जाऊन ते कुजण्याची क्रिया वेगाने सुरु हाते.

हिरवळीचे पीक कुजण्यास जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असावा लागतो म्हणून सर्वसाधारणपणे हिरवळीच्या पिकांची पेरणी जून अथवा पावसाच्या सुरवातीस करुन ऑगस्टमध्ये गाडणी करावी. हिरवळीचे पीक गाडण्याच्या वेळी जर पाऊस पडला नाही किंवा जमिनीलगत ओलावा कमी असेल तर पाणी द्यावे. त्यामुळे कुजण्याची प्रक्रिया जलद होईल.

शेतात उपलब्ध काडी कचरा व गवत यांचे ढिग शेतात जागोजागी करुन कुजण्यास ठेवावे व योग्यवेळी जमिनीत गाडावे कुजण्याची प्रक्रिया लवकर होण्यास ३.५ फुट बाय ३.५ फुट खड्ड्यात गवत व काडी कचरा कुजवता येईल.

पेरण्याची वेळ

ताग, धैंचा, उडीद, मूग या हिरवळीच्या खत पिकांची पेरणी करण्यास उत्तम वेळ म्हणजे जून किंवा जुलैची सुरुवात होय. मान्सून चालू होण्याअगोदरच पिक जोमाने वाढले म्हणजे मान्सूनच्या पावसामुळे ते जमिनीवर लोळणार नाही.

हिरवळीचे खत पिक जमिनीत गाडण्याची वेळ सर्वसाधारणपणे पिक फुलोऱ्यात यावयास लागल्यानंतर गाडणे हितकारक ठरते. कारण त्यावेळी पिक सर्वसाधारणपणे आठ आठवड्यांचे असून त्याची भरपूर वाढ झालेली असते व झाडे टणकही झालेली नसतात.

हिरवळीच्या खतांचे फायदे:

जमिनीत टिकून राहणाऱ्या कणसमूहांचे प्रमाण वाढते. जमिनीची जलधारणा क्षमता वाढते. त्याचप्रमाणे पावसाच्या पाण्यामुळे होणारी जमिनीची धूपही कमी होते. द्विदल वर्गातील हिरवळीची पिके ही हवेतील नत्र शोषून घेतात आणि ते नत्र जमिनीत साठविले जाऊन ते पुढील पिकांना उपलब्ध होते. क्षार जमिनीत हिरवळीचे पीक गाडण्यामुळे जमिनीतील क्षार कमी होऊन त्या जमिनी लागवडीखाली आणता येतात. हिरवळीच्या खताची पिके जमिनीत असेंद्रिय स्फुरदाचे सेंद्रिय स्फुरदात रूपांतर करतात व जमिनीतील स्फुरदाची उपलब्धता वाढवितात. हिरवळीच्या पिकांच्या दाट वाढीमुळे तणांचा नायनाट होण्यास मदत होते. हिरवळीच्या खतांमध्ये ह्युमस नावाचे सेंद्रिय द्रव्य असते, त्यामुळे मातीला काळा रंग येतो.हिरवळीच्या खतामधील सेंद्रिय द्रव्यांमुळे जमिनीतील सूक्ष्म जिवाणुंना अन्नद्रव्याची उपलब्धता वाढते. परिणामी जिवाणुंची वाढ भरपूर होऊन त्यांची कार्यशक्ती जोमाने वाढते. जमिनीतील पोषक द्रव्ये रासायनिक क्रियेने विरघळून ती पिकांना सुलभ स्थितीत प्राप्त होतात. लवकर कुजणारी हिरवळीची खते वापरल्यामुळे एकूण नत्र, उपलब्ध स्फुरदचे प्रमाण आणी एझोटोबॅक्टरसारख्या जीवाणुंचे प्रमाण वाढते. सेंद्रिय पदार्थांमुळे माती रवेदार होण्यास मदत होते. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत साचून न राहता. त्याचा निचरा लवकर होतो. हलक्या जमिनीत देखील सेंद्रिय पदार्थांमुळे पाणीधारण करण्याची क्षमता वाढते.

सेंद्रीय पध्दतीने ऊसासाठी खत व्यवस्थापन

शाश्वत पध्दत

उसाचे भरघोस उत्पादन घेण्यासाठी उसाला संतुलित खताचा पुरवठा करणे आवश्यक आहे. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. या समस्येवर मात करण्यासाठी उसाचे एकात्मिक पद्धतीने खत व्यवस्थापन करणे महत्वाचे आहे. एकात्मिक पद्धतीने खताचा पुरवठा करत असताना खालील प्रकारे खताच्या मात्रा व खते दिल्यास उत्पादनात वाढ होईल.

सेद्रिय खते भर खते शेणखत जमिनीची पूर्वमशागत करत असताना नांगरणीनंतर वखराच्या शेवटच्या पाळीअगोदर हेक्टरी ३० टन शेणखत शेतात मिसळून घ्यावे व त्यानंतर ऊस लावणीच्या आधी १० टन शेणखत व रासायनिक खताचा पहिला हसा सरीमध्ये मातीत मिसळून द्यावा. कंपोस्ट खते कंपोस्ट खत शेताबाहेर तयार करून त्याचा वापर ऊसशेतीमध्ये करावा. खत तयार करण्याकरिता शेतातील पालापाचोळा, उसाचे पाचट, टाकाऊ पदार्थ, पिकाचे अवशेष इत्यादींचा वापर करून तयार करावे. साधारणपणे ४ ते ५ महिन्यांनी तयार झालेले कंपोस्ट खत हेक्टरी ३० टन याप्रमाणे शेवटच्या वखरणीच्या अगोदर टाकावे. खोडवा उसामध्ये पाचट कुजवून त्यापासूनसुद्धा कंपोस्ट खत मिळवू शकतो. त्यासाठी ऊसतोडणी झाल्यानंतर उसाच्या पाचटावर ४० किलो युरिया व २० किलो सिंगल सुपर फॉस्फेट फवारावे. तसेच, ५ किलो पाचट कुजवणारे जिवाणुसंवर्धक शेणामध्ये मिसळून पाचटावर टाकून त्यानंतर पाणी द्यावे. त्यानंतर रिजरच्या सहाय्याने बगला फोडून पाचटावर माती टाकल्यास पाचट जागेवर कुजते.

सूक्ष्म अन्नद्रव्ये

खालीलप्रमाणे सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा उसाला द्यावी.

जोर खते ऊसपिकासाठी सेंद्रिय जोर खताचा वापर करू शकतो. यामध्ये वेगवेगळया पेंड, मासाचे खत, रक्ताचे खत, हाडाचे खत व मासोळी खत यांचा वापर केला तर अधिक उत्पादन मिळते. एकंदर पेंडीपैकी ८५ टक्के खाद्य पेंडी असून १५ टक्के अखाद्य पेंडी आहेत. पेंडीची पावडर करून ती ओलसर जमिनीत ऊस लावणीपूर्वी घालावी. जोर खतामध्ये भर खताच्या तुलनेमध्ये नत्र, स्फुरद व पालाश यांचे प्रमाण अधिक असते. प्रेसमड केक ऊस कारखान्यातील टाकाऊ प्रेसमड केक यांचा उपयोग ऊसपिकासाठी करू शकतो. जमिनीमध्ये पाण्याचा हमखास पुरवठा असल्यास तीन वर्षांमधून एकदा हेक्टरी १५ टन याप्रमाणे ओल्या प्रेसमड केकची शिफारस केली आहे.

हिरवळीचे खत

हिरवळीच्या खतासाठी ताग, धेंचा, चवळी व गिूरीसीडीया इत्यादी पदार्थाचे प्रमाण वाढते तागापासून ९० किलो, धेंचापासून ८५ किलो, चवळीपासून हेक्टरी ७५ किलो नत्र जमिनीस मिळते. हिरवळीचे पीक ४५ दिवसांनी फुलो-यात आल्यावर जमिनीत गाडावे. अथवा कापणी करुन जमिनीत गाडावे किंवा सरीच्या बगलेस चळी घेऊन गाडावे.

गांडूळ खत गांडूळ खत हे एक उत्तम प्रकारचे खत असून त्यामध्ये नत्र १ ते २ टक्के, स्फुरद १ टक्के व पालाश ०.५ टक्के असून सूक्ष्म अन्नद्रव्ये, संप्रेरके व एन्झाईम्स मोठ्या प्रमाणामध्ये असतात. उसाकरिता हेक्टरी ५ टन गांडूळ खताची शिफारस केली असून त्यामधून १५द; १दद:१दद किलो नत्र, स्फुरद व पालाश पिकास मिळते. गांडूळ खताबरोबर व्हर्मीवॉशचा वापर उसाकरिता करु शकतो.

आतंरक्षीकरण करणे

ॲसेटोबॅक्टर १द किलो हेक्टरी किंवा ॲझोटोबॅक्टर/ॲझोस्पीरीलम १० किलो हेक्टरी अधिक पीएसबी १द किलो हेक्टरी याप्रमाणे वापरावे. हेक्टरी १द किलो ऑसिटोबॅक्टर अधिक १० किलो पीएसबी जिवाणू खते कंपोस्ट खतामध्ये मिसळवून लागवडीच्या वेळेस जमिनीत द्यावीत किंवा ५ किलो जिवाणू (ॲझोटोबॅक्टर अधिक ॲझोस्पीरीलम अधिक ॲसेटोबॅक्टर अधिक पीएसबी) प्रत्येकी १.२५ किलो खते एकत्रित मिसळून बेणेप्रक्रिया करावी. ऊसपिकावर कोणत्या सूक्ष्म अन्नद्रव्याची आवश्यकता आहे, हे लक्षात घेऊन तसेच मातीपरीक्षण करून आवश्यक त्याच सूक्ष्म अन्नद्रव्याचा पुरवठा करावा.

जोमदार वाढणारे पिक अळू

नव्या वाटा

अळू

हे जोमाने वाढणारे पीक आहे. याच्या पानांचा वापर वडी तयार करण्यासाठी केला जातो, तर कंद उकडून खातात. नारळ, सुपारी बागेत आंतरपीक किंवा सलग पीक म्हणून अळूची लागवड करता येते. अळू लागवडीसाठी खोल, चांगल्या निचरा, सुपीक गाळाची पण भुसभुशीत आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध अशी जमीन निवडावी. जमिनीचा सामू उदासीन असावा. पोयटायुक्त जमिनी पिकास चांगल्या समजल्या जातात. अतिबारीक कणाची चिकणयुक्त जमीन पिकास अयोग्य असते. पिकाचा कालावधी जास्त असल्याने जमीन प्रथम २० ते २५ सें. मी. खोलवर नांगरावी. नंतर उभी-आडवी कुळवणी करून ढेकळे फोडून जमीन सपाट करावी. शेवटच्या कुळवणीवेळी जमिनीत १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळून द्यावे. जमिनीची पूर्वतयारी करताना जमीन चांगली भुसभुशीत होईल याकडे लक्ष द्यावे. सलग लागवड करावयाची असल्यास ९० सें. मी. अंतरावर सरी वरंबे तयार करावेत.

सुधारित जात- कोकण हरितपर्णी

१) काळपट जांभळया देठाची, मोठे रुंद त्रिकोणी पान असलेली व भरपूर कंद येणारी जात. याची पाने अळूवडी करण्यासाठी उपयुक्त.

२) हेक्टरी ४ ते ५ टन हिरव्या पानांचे (देठासहित) आणि ५ ते ६ टन कंदाचे उत्पादन.

लागवडीचे तंत्र

१) लागवड वर्षभर केव्हाही करता येते. लागवडीसाठी सरी वरंबा, सपाट वाफे किंवा गादी वाफा पद्धतीचा अवलंब करावा. मात्र, चांगल्या निचऱ्याबरोबर पुरेसा ओलावा जमिनीमध्ये टिकून राहील याची काळजी घ्यावी.

३) लागवडीसाठी ९० बाय ९० सें. मी. अंतर ठेवावे. लागवडीसाठी मुख्य कंदाचा वापर केला जातो. कंद ८ ते १० सें. मी. खोलीवर लावावेत. कंद मातीने चांगल्या झाकावेत.

४) ९० बाय ९० सें. मी.वर लागवड केल्यास प्रतिगुंठ्यास १२५ ते १३० कंदांची आवश्यकता असते.

५) पावसाळयात अतिपावसाच्या भागात सरी वरंब्यावर लागवड करावी, तर उन्हाळी हंगामात सऱ्या फोडून सपाट वाफे तयार करावेत. आंतरपीक म्हणून लागवड करावयाची असल्यास सपाट वाफे पद्धत वापरावी. मात्र, या ठिकाणी पाण्याचा चांगला निचरा होईल याकडे लक्ष द्यावे. जमिनीत ओलावा असणे हे अळू पिकाच्या वाढीसाठी आणि अधिक उत्पादनाच्या दृष्टीने चांगले असते.

६) जमिनीची पूर्वमशागत करतेवेळी हेक्टरी १० टन शेणखत मिसळून द्यावे.

७) माती परीक्षणानुसार हेक्टरी ८० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ८० किलो पालाश ही खतमात्रा द्यावी. यापैकी स्फुरद खताची संपूर्ण मात्रा लागवडीवेळी द्यावी. नत्र व पालाश खते दोन वेळा समान हप्त्यात विभागून द्यावीत. खताचा दुसरा हप्ता आळे पद्धतीने देऊन मातीने झाकून घ्यावा, त्यानंतर लगेच पाणी द्यावे.

८) ओलावा जेवढा जास्त तेवढ्या प्रमाणात पानांचे उत्पादन जास्त मिळते. पावसाळयात पिकास पाणी देण्याची आवश्यकता नसते. मात्र, त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे. पाणी मुळाशी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी.

९) नारळ, सुपारी, चिकू बागेत आंतरपीक म्हणून अळू लागवड केल्यास मुख्य पिकास पाणी देताना आपोआपच वडीच्या अळू पिकास पाणी दिले जाते. त्यामुळे स्वतंत्र व्यवस्था करण्याची गरज नाही.

१०) पिकाच्या लागवडीसाठी दोन ओळी आणि दोन झाडांमधील अंतर जास्त असल्याने पिकाच्या सुरवातीच्या अवस्थेत तणांशी स्पर्धा होऊ शकते. त्यासाठी सुरवातीस २० ते २५ दिवसांनी आणि ४० ते ४५ दिवसांनी तण नियंत्रण करावे. एकदा पिकाची वाढ झाली की तणांचा प्रादुर्भाव कमी होतो. दुसरी बेणणी केल्यानंतर खतांची दुसरामात्रा देऊन पिकास भर द्यावी.

११) या पिकापासून पाने व कंद असे दोनही उत्पादन मिळते. पानांचा आकार योग्य लक्षात घेऊन बाजारात विक्रीसाठी पाने काढावीत. पहिल्या वेळी पाने काढल्यानंतर पुन्हा १५ ते १८ दिवसांनी अंतराने पाने काढणीस तयार होतात. पाने काढताना देठासहित काढावीत. कंदासाठी उत्पादन घेत असताना मात्र पानांची खुडणी जास्त करू नये.

१२) योग्य व्यवस्थापन केल्यास हिरव्या पानांचे (देठासहित) हेक्टरी ४ ते ५ टन, तर कंदाचे ५ ते ६ टन उत्पादन मिळते.

डॉ. नामदेव म्हसकर

प्रतिनिधी

किवी फळ शेतीने शेतकऱ्यांचे नशीब चमकवलं, वर्षाला करताय लाखोंची कमाई

शिमला : हिमाचल प्रदेशातील शेतकरी आता बागायती पिकांच्या लागवडीत अधिक रस घेत आहेत. टोमॅटो, सिमला मिरची, सोयाबीन, वाटाणे, आले, लसूण या नगदी पिकांच्या लागवडीतून येथील शेतकरी चांगले उत्पन्न घेत आहेत. विशेषतः सिरमौर जिल्ह्यातील पच्छड भागात शेतकरी मोठ्या प्रमाणावर किवीची लागवड करत आहेत. येथील शेतकरी किवीपासून वर्षाला लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. त्यामुळेच पच्छाद परिसरात किवीचे क्षेत्र १६ हेक्टरपर्यंत वाढले आहे.

नरग उप-तहसीलच्या थलेडी गावातील प्रगतशील शेतकरी विजेंद्र सिंह ठाकूर मोठ्या प्रमाणावर किवीची लागवड करत आहेत. ठाकूर यांनी १९९० च्या दशकात एलिसन आणि हेवर्ड जातींची १०० रोपे लावून किवी शेती सुरू केली. चार वर्षांनंतर त्यांनी आपल्या बागेत आणखी ५० रोपे लावली. ते म्हणाले की,चालू वर्षी मी माझ्या बागेतून सुमारे ५० क्विंटल किवीचे उत्पादन घेतले, ज्यातून मला सुमारे १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

१९९३ मध्ये किवी लागवडीला सुरुवात झाली

मुख्यमंत्री किवी प्रोत्साहन योजनेंतर्गत १०० किवी रोपे लावण्यासाठी राज्य सरकारकडून १.६ लाख रुपयांचे अनुदान मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. ठाकूर यांच्या कुटुंबात ६ लोक आहेत. त्यांचे संपूर्ण कुटुंब शेती आणि बागायती व्यवसायाशी संबंधित आहे. त्यांनी दोन मजूरही ठेवले आहेत. किवी व्यतिरिक्त, ते टोमॅटो, शिमला मिरची, मटार आणि लसूण याची देखील शेती करतात. पुढे जावून नरेंद्र पवार नावाच्या प्रगतशील शेतकऱ्यासोबत शेती सुरू केली. नरेंद्र पवार हे विजेंद्रसिंह ठाकूर यांच्यासारखेच प्रगतशील शेतकरी आहेत. १९९३ मध्ये त्यांनी किवीची शेती सुरू केली. तेही पच्छादचे रहिवासी आहेत. त्यांनी नौनी येथील डॉ. वाय.एस. परमार फलोत्पादन आणि वनीकरण विद्यापीठातून १५० किवी रोपे विकत घेतली आणि विद्यापीठाकडून किवी लागवडीचे बारकावे शिकून घेतले. सध्या पवार यांच्या बागेत ३०० किवीची झाडे आहेत आणि त्यांनी यावर्षी सुमारे ९० क्विंटल फळांचे उत्पादन घेतले आहे, ज्यामुळे त्यांना १५ लाखांपेक्षा जास्त उत्पन्न मिळाले आहे.

६,००० फूट उंचीवर शेती केली जाते

मुख्यमंत्री किवी प्रोत्साहन योजनेंतर्गत सरकार किवी शेतीला प्रोत्साहन देत असल्याचे शेतकरी नरेंद्र पवार यांनी सांगितले आहे. बेरोजगार तरुणांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांच्याकडून करण्यात आले आहे. सध्या पच्छाद परिसरात १६ हेक्टरमध्ये किवीची लागवड केली जात असून, त्यातून वर्षाला सुमारे १३३ मेट्रिक टन फळांचे उत्पादन होते. किवी शेती ४,००० ते ६,००० फूट उंचीच्या भागात केली जाते. किवीच्या लोकप्रिय जातींमध्ये ॲलिसन, ब्रुनो, मॉन्टी, ॲबॉट आणि हेवर्ड यांचा समावेश आहे.

किवी खाण्याचे अनेक फायदे

पच्छादचे फलोत्पादन विकास अधिकारी राजेश शर्मा म्हणाले की, या भागातील हवामान किवी लागवडीसाठी योग्य आहे. मुख्यमंत्री किवी प्रोत्साहन योजनेअंतर्गत सरकार किवी शेतीला सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे. या उपक्रमाचा बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा. किवी हे फळ रक्तातील प्लेटलेटची संख्या वाढवण्यासाठी आणि ?निमियाशी लढण्यासाठी ओळखले जाते.

सुविचार - श्रीमंत होण्यापेक्षा गुणवंत होण्याचा प्रयत्न करा.

अनपेक्षित मोठा विजय....!

अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून जो बायडेन यांनी माघार घेतल्यानंतर कमला हॅरिस अध्यक्षपदाच्या उमेदवार ठरल्या. त्यावेळी म्हणजे सुरुवातीच्या काळात कमला हॅरिस या सहज निवडून येतील असेच वातावरण होते. कमला हॅरिस यांना मोठ्या प्रमाणात जनतेचा पाठिंबा मिळत होता, दुसरीकडे आधीपासूनच वादग्रस्त असलेले ट्रम्प आपल्या वक्तव्यांनी अधिकच वादग्रस्त ठरत होते; परंतु नंतरच्या काळात ट्रम्प यांनी अगदी नियोजनबद्ध प्रचार करीत सामान्य, विशेषतः ग्रामीण भागातील मतदारांच्या भावनांना हात घालणारे मुद्दे प्रचारात आणले. त्यामुळे निवडणुकीची हवा बदलत गेली. अखेरच्या टप्प्यात ही निवडणूक अतिशय चुरशीची होईल, असे चित्र निर्माण झाले. 'स्विंग स्टेटस्' म्हणून ओळखले जाणारे प्रांत ज्या कुणाच्या पारड्यात आपला कौल देतील त्याचा विजय होईल हे स्पष्टच दिसू लागले. या आधीच्या निवडणुकीत याच राज्यांनी डेमोक्रॅट पक्षाला साथ दिली होती, त्यामुळे ट्रम्प यांना पराभव स्वीकारावा लागला होता. आताही तसेच काहीसे होईल असा अंदाज वर्तविण्यात येत होता; परंतु चुरशीच्या ठरू पाहणाऱ्या या निवडणुकीत शेवटच्या टप्प्यात ट्रम्प यांनी जोरदार मुसंडी मारली आणि अगदी सहज विजय प्राप्त केला. पेनसिल्वेनिया, जॉर्जिया, व्हिस्कॉन्सिन ही 'स्विंग स्टेट्स' रिपब्लिकन पक्षाने डेमोक्रॅट्सकडून खेचून आणली. तेथील ४५ इलेक्टोरल मते अंतिम आकडेवारीत निर्णायक ठरली. व्हिस्कॉन्सिन जिंकून ट्रम्प २७७ जागांवर पोहोचले आणि विजयासाठी आवश्यक २७० हा आकडा त्यांनी सहज ओलांडला. कमला हॅरिस यांच्या पराभवामुळे अमेरिकेच्या अध्यक्षपदी महिला विराजमान होण्याची शक्यता पुन्हा एकदा संपुष्टात आली. २०१६मध्ये डेमोक्रॅटिक पक्षातर्फे हिलरी क्लिंटन यांनी निवडणूक लढवली होती. त्या निवडणुकीत त्यांना ट्रम्प यांच्या तुलनेत प्रत्यक्ष मते अर्थात पॉप्युलर व्होटस् अधिक मिळाली होती; परंतु इलेक्टोरल किंवा प्रातिनिधिक मतांच्या गणितात त्या मागे पडल्या होत्या. आठ वर्षानंतर पुन्हा एकदा एका महिलेने अमेरिकेचे हे सर्वोच्च पद प्राप्त करण्याची लढाई लढली; परंतु ट्रम्प यांच्यासमोर मोठे आव्हान उभे करूनही शेवटी कमला हॅरिस यांना पराभव स्वीकारावा लागला. ट्रम्प यांनी या निवडणुकीत स्थलांतरित आणि गौरेतर या मुद्यावर विशेष भर दिला होता. कदाचित त्याचाही फटका कमला हॅरिस यांना बसला असण्याची शक्यता आहे. कमला हॅरिस या स्थलांतरित वर्गवारीत मोडणाऱ्या आहेतच, शिवाय त्या गौरेतरही आहेत. बराक ओबामांचा अपवाद वगळता आतापर्यंत अमेरिकेच्या अध्यक्षपदी एकाही गौरेतर व्यक्तीला संधी मिळालेली नाही. स्थलांतरित लोकांमुळे अमेरिका असुरक्षित झाली आहे, अमेरिकन लोकांचे रोजगार हे स्थलांतरित बळकावत आहेत, ते कर भरत नाही, उलट सगळ्या सुविधा घेतात, अगदी तुमच्या पाळीव प्राण्यांना ते मारून खात आहेत, या पातळीवर ट्रम्प यांनी प्रचार केला. यातील बहुतेक मुद्दे प्रचारकी थाटाचे, तथ्यहीन असले तरी याच मुद्यांमुळे पारंपरिक रिपब्लिकन मतदारांसोबतच तटस्थ समजले जाणारे तरुण मतदारही प्रभावित झाले. प्रचार मोहिमेदरम्यान जुलै महिन्यात ट्रम्प यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. त्यांच्या कानाला गोळी चाटून गेली होती त्यावेळी ट्रम्प यांनी आपली रक्ताळलेली मूठ उगारत आपण लढणार असल्याचा संदेश दिला, या प्रसंगामुळेही ट्रम्प यांना सहानुभूती मिळाल्याचे बोलले जात आहे. ट्रम्प हे हुकूमशाही प्रवृत्तीचे आणि एककल्ली स्वभावाचे गृहस्थ आहेत. ते पराभव स्वीकारणार नाही, अमेरिकेची लोकशाही व्यवस्थाच ते उधळून लावतील, हा विरोधकांचा प्रचार तितकासा प्रभावी ठरला नाही. गर्भपाताच्या मुद्यावरही शहरी भागात कमला हॅरिस यांना पाठिंबा मिळाला असला तरी ग्रामीण भागात त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे दिसून येते. महागाईचा मुद्दादेखील बायडेन प्रशासनाच्या विरोधात गेला. अर्थात या निवडणुकीत बेरोजगारी, महागाई, अमेरिकेची अर्थव्यवस्था वगैरे विषयांऐवजी वैयक्तिक टीकाटिप्पणीच अधिक प्रभावी ठरल्याचे दिसते. हिलरी क्लिंटन यांनी ट्रम्प समर्थकांना शिसारी आणणारे असे संबोधले तर बायडेन यांनी एका प्रचारसभेत ट्रम्प आणि समर्थकांची कचरा अशा शब्दात खिल्ली उडविली. या वक्तव्यांचा वापर करीत ट्रम्प आणि रिपब्लिक पक्षाच्या समर्थकांनी डेमोक्रॅटिक पक्षाचे उच्चशिक्षित, शहरी नेते सामान्य लोकांकडे तुच्छतेने पाहतात असा प्रचार केला. त्यामुळे तरुण मतदार, ग्रामीण शेतकरी वर्ग, धार्मिक आणि श्रद्धाळू लोक रिपब्लिकन पक्षाकडे ओढले गेले. या सगळ्याचा परिपाक म्हणून ट्रम्प यांना अनपेक्षित मोठा विजय साकारता आला.

भाजपची व्यूहरचना.....!

महायुती आणि महाविकास आघाडीचे सगळे नेते सध्या जरी एकमेकांसोबतच राहण्याच्या आणाभाका घेत असले तरी निवडणुकीनंतर प्रत्येक पक्ष आपल्या सोईनुसार भूमिका बदलू शकतो. त्यामुळेच वरवर जरी हे सगळे नेते आणि पक्ष एकत्र दिसत असले तरी आतून प्रत्येक जण प्रत्येकाकडे संशयानेच पाहत आहे. निवडणुकीनंतरच्या संभाव्य परिस्थितीचा विचार करून भाजपने आपली वेगळी व्यूहरचना आखल्याचे दिसते. महायुतीकडे सत्ता यावी यासाठी भाजपचा प्रयत्न तर आहेच; परंतु सत्तेसाठी आवश्यक संख्याबळाचे गणित जुळविताना कमीतकमी सहकाऱ्यांची गरज भासावी असा भाजपचा प्रयत्न दिसतो. त्यासाठी भाजपचे अधिक आमदार निवडून येणे तर गरजेचे आहेच, शिवाय ही संख्या कोणत्याही एका मित्रपक्षाला सोबत घेऊन सत्ता स्थापन करण्याइतपत असावी ही भाजपची रणनीती आहे. त्यासाठीच भाजपचे स्वतःच्या चिन्हावर १४८ उमेदवार रिंगणात आहेत, शिवाय ज्या चार जागा भाजपने मित्रपक्षांना सोडल्या त्यादेखील शेवटी भाजपच्याच खात्यात मोजल्या जातील. सोबतच अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाकडून मूळचे भाजपचे असलेले काही उमेदवार रिंगणात आहेत. ही सगळी गोळाबेरीज साधारण १७० पर्यंत जाते. शिवाय सध्या महायुतीत नसलेल्या राज ठाकरेंचेही भाजपला समर्थन मिळणार आहे. मनसेचे किती आमदार निवडून येतात हे सांगणे कठीण असले तरी मनसेमुळे भाजपच्या अनेक उमेदवारांच्या विजयाचा मार्ग मोकळा होऊ शकतो. मनसेचे या निवडणुकीत स्वतंत्र लढणे हा एक रणनीतीचा भाग असल्याचे म्हटले जात आहे. तशी काही रणनीती असेल तर ती नक्कीच भाजपने आखलेली आहे. उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवारांकडे वळणाऱ्या मतांपैकी एक मोठा भाग मनसेने आपल्याकडे खेचावा आणि या विभागणीतून भाजप उमेदवाराचा फायदा व्हावा, अशी ही रणनीती असल्याचे बोलले जात आहे. भाजपच्या या रणनीतीचा फटका शिंदे आणि अजित पवार गटाला बसू शकतो. हे दोन्ही गट कमकुवत झाले तर त्यांना हाताळणे भाजपसाठी अधिक सोपे जाईल. तशीच वेळ आल्यास त्यापैकी एका गटाला आपल्यात सामावूनही घेता येईल, ही भाजपची संभाव्य व्यूहरचना असू शकते.

भाष्य

पोलिसदलाचे राजकीयीकरण आणि शुक्लांची 'उचलबांगडी'

अनंत बोरसे
9158495037

राजकीय पक्ष, नेते आणि पोलीस यांच्यामधील सुमधूर संबंधांबाबत केलेले भाष्य योग्यच आहे. 'सद् रक्षणायः खल निग्रहणायः' हे पोलीस दलाचे ब्रिदवाक्य मात्र आज खरोखरंच पोलीस आपल्या ब्रिदवाक्याशी प्रामाणिक राहून आपले कर्तव्य पार पाडत आहेत का, यावर भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे आणि याला कारण राजकारण आणि सत्ताकारणापायी राजकारण्यांनी सगळ्याच स्वायत्त यंत्रणांचा केलेला खेळखंडोबा. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली केली जावी, कारण त्यांची नियुक्ती ही वादग्रस्त ठरली आहे, त्यांना मुदतवाढ देऊन पदावर ठेवण्यात आले आहे याचे कारण म्हणजे त्या सत्ताधारी विशेषतः भाजपधार्जिणी भूमिका घेणाऱ्या आहेत, अशी भूमिका घेत काँग्रेस निवडणूक आयोगाकडे त्यांच्या बदलीची मागणी वारंवार करत आहे. मात्र, निवडणूक आयोग याची दखल घेत नाही याउलट भाजपने काही मागणी केली की निवडणूक आयोग तात्काळ कारवाई करते हे झारखंडमधील बदल्यांवरून अधोरेखित झाले आहे. राजकारण्यांनी सगळ्याच संस्थाचे राजकीयीकरण करून टाकले आहे, महाराष्ट्र पोलीस दलदेखील त्याला अपवाद नाही. कोणता पोलीस अधिकारी कोणत्या राजकीय नेत्याच्या जवळचा, कोणासाठी काम करणारा हे सहज ओळखता येते. पंचवीस तीस वर्षांपूर्वी पोलिसदलाचे एवढ्या मोठ्या प्रमाणावर राजकियीकरण झाले नव्हते त्याकाळी पोलीस दलाची तुलना स्कॉटलंड यार्ड पोलिसांशी केली जायची, जनतेमधेदेखील पोलिसांची चांगली प्रतिमा होती, मात्र पोलीस दलात राजकीय हस्तक्षेप वाढला आणि प्रत्येक सत्ताधाऱ्यांनी पोलीस दलाचा वापर आपल्या स्वार्थासाठी करण्यास सुरुवात झाली आणि तो दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहे. त्यामुळे पोलीसदेखील आपले कर्तव्य, जबाबदारीचे भान विसरून आपापले हित कसे साधतात हे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. काही मोजक्याच जे.एफ. रिबेरो, अरविंद इनामदारसारख्या पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या वर्दीशी इमान राखत पोलीस दलावर आपला ठसा उमटविला आहे. मात्र, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. पोलीस दलाचे राजकियीकरण तर झाले आहेच, पण पोलिसदलात अनेक टोळ्या निर्माण झाल्या आहेत. अनेकांचे तर गुंडाशीच संबध निर्माण झाले आहे आणि पोलिसदलातच अनेकदा टोळीयुद्ध होताना दिसते. रश्मी शुक्लांवर तर विरोधकांचे फोन टॅपप्रकरणी आरोप झाले आहेत. अनेक पोलीस अधिकारी आपल्या नेत्याच्या इशाऱ्यावरून कामगिरी करतात, त्याची बक्षिसी त्यांना सेवानिवृत्तीनंतर वा प्रसंगी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेऊन मिळते. गुन्हेगारांना वचक बसणे, शिक्षा होणे तर दूरच अनेकदा गुंड-पोलीस यांची दोस्ती पार्ट्यां झोडताना दिसते. पोलिसांना स्वतंत्रपणे काम करूच दिले जात नाही. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलीस दलावर आहे मात्र नेमके तेच महाराष्ट्रात होत नाही. शरद पवार यांनी पोलिसांच्या संदर्भात गंभीर आरोप केला आहे तो निराधार म्हणता येणार नाही. राजकारण्यांच्या अशा भूमिकेमुळे तेदेखील वाहत्या गंगेत आपले हात धुवून घेत आहेत, त्यामुळेच अनेक अधिकारी करोडो रुपयांची नामी-बेनामी मालमत्ता बाळगून आहेत. राजकीय नेत्यांचे पाठबळ असेल तर काहीही केले तरी चालते, अशी भावना पोलीस दलात मोठ्याप्रमाणावर फोफावली आहे. सामान्य जनता तर पोलिसांपासून चार हात दूर राहणे पसंत करते. काही पोलीस तर सरकारी परवानाधारक गुंडाप्रमाणे वागतात. सर्वात जास्त भ्रष्टाचार पोलीस दलात होत आहे, बदल्यांसाठी, क्रिम पोस्टिंगसाठी करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल, देवाणघेवाण होत असते अशा चर्चा नेहमीच होत असतात. पोलीस रिफॉर्मच्या गोष्टी सगळेच करतात मात्र तसे व्हावे अशी ना कोणाची प्रामाणिक इच्छाशक्ती ना मानसिकता. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आपल्या पदाचा, अधिकाराचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच होत आहे. एकूणच पोलीस दलासहित सर्वच यंत्रणा, व्यवस्था यांच्या विश्वासार्हतेवर मोठेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. जनतेमधील पोलिसांची प्रतिमा बदलणे गरजेचे आहे.

निवडणुका जाहीर झाल्या आणि आचारसंहिता लागली की निवडणूक आयोगाला अमर्याद अधिकार प्राप्त होतात, कारण निवडणुका या सर्वांना समान संधी, पारदर्शकपणे, निःपक्षपातीपणे पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. एखादा वादग्रस्त अधिकारी मग तो कितीही मोठ्या पदावर असला तरी निवडणूक आयोग त्याला त्या पदावरून हटवण्याचे आदेश देऊ शकते. राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली होती, कारण रश्मी शुक्ला या सत्ताधारी पक्ष विशेषतः भाजपशी एकनिष्ठ राहून काम करतात आणि मविआच्या काळात विरोधी पक्षनेत्यांचे फोन टॅपप्रकरणी त्यांच्यावर आरोप झाले होते. मात्र, राज्यात सत्तांतर होताच रश्मी शुक्ला यांना 'अच्छे दिन' आले आणि त्या राज्याच्या महासंचालक बनल्या, जूनमध्ये त्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असताना त्यांना चक्क दोन वर्षांची मुदतवाढ देऊन पदावर कायम ठेवण्यात आले. अपेक्षेप्रमाणे निवडणूक आयोगाने काँग्रेसची मागणी फेटाळून लावली, काही दिवसांपूर्वीच पुन्हा एकदा काँग्रेसने त्यांना हटवण्याची मागणी केली आणि निवडणूक आयोगाने त्यांच्या बदलीचे आदेश दिले, मात्र निवडणूक आयोगाला हे सुचलेले उशिराचे शहाणपण आहे की अन्य काही, कारण गेल्या काही वर्षांपासून विशेषतः राजीवकुमार हे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत असल्यापासून ते भाजपधार्जिणी भूमिका घेत आहेत हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. हरियाणा निवडणुकीतदेखील भाजपने मागणी करताच मतदानाची तारीख बदलली, यापूर्वी भाजप, नरेंद्र मोदी यांना घोषणा करण्याची अधिक संधी मिळावी म्हणून निवडणुका जाहीर करताना उशीर केला होता. हरियाणाबरोबरच महाराष्ट्राची निवडणूक दरवेळी एकाचवेळी होते. मात्र, यावेळी निवडणूक आयोगाने ती एकत्र न घेता वेगवेगळी घेतली ती केवळ महायुती सरकारला अधिकच वेळ मिळावा यासाठीच. झारखंडमध्ये भाजपने मागणी करताच तेथील अधिकाऱ्यांना तातडीने हटवण्याचे आदेश देणारा निवडणूक आयोग महाराष्ट्राबाबत मात्र कालापव्यय करत होता, पण अखेर त्यांची बदली करावीच लागली. त्यांची भाजपधार्जिणी भूमिका ही काही लपून राहिलेली नव्हती, अहिल्यानगर जिल्ह्यात काँग्रेसच्या जयश्री थोरात यांच्यावर भाजपचे नेते सुजय विखे यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केली. मात्र, त्यांच्यावर गुन्हा दाखल करून घेण्यास टाळाटाळ केली गेली आणि अखेर गुन्हा दाखल केला गेला. बदलापूर प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक करण्यात केलेली दिरंगाई, आणि पोलिसांची, रश्मी शुक्ला यांची भुमिका वादग्रस्त ठरली. रश्मी शुक्ला यांची बदली झाली असली तरी त्या सेवेत कायम असणार आहेत, आता त्यांना निवडणूक कामकाजातून दूर ठेवले जाईल, मात्र निवडणुकीनंतर महायुतीचे सरकार आले तर त्या पुन्हा एकदा राज्याच्या पोलीस महासंचालक होऊ शकतात. राजकारणी आणि वरिष्ठ नोकरशहा यांची युती किती घट्ट आहे हे शुक्ला प्रकरणावरून दिसून येते. निवडणूक आयोगाची ताकद काय असते हे कै. टी. एन शेषन यांनी देशाला आणि जगाला दाखवून दिले होते, मात्र दुर्दैवाने असे शेषन देशाला पुन्हा लाभले नाही त्यामुळे निवडणूक आयोग हे केवळ सत्ताधारी पक्ष धार्जिणी भूमिका घेऊन काम करते अशी जनमानसात प्रतिमा, भावना निर्माण झाली आहे हे आजचे वास्तव आहे. रश्मी शुक्ला प्रकरणी निवडणूक आयोगाला सुचलेले उशिराचे शहाणपण हेही नसे थोडके. मात्र, आता जो कोणी येईल त्याच्याकडून महाराष्ट्राला मोठ्या अपेक्षा आहेत, राव गेले आणि पंत आले असे होऊ नये.

शहापूर, जि. ठाणे

दृष्टिक्षेप

'वाँटेड आध्यात्मिक पत्रकार'?



लोकनाथ काळमेघ
9096494894

'घसरण', 'अध:पतन', 'गचाळ', 'अमूल्यन', 'लाचार'... अशी कितीही विशेषणे तुम्ही पत्रकारितेला लावली, तरी तिचे काही बिघडत नाही. ती फार पूर्वीच म्हणजे साधारण १० वर्षांपूर्वीच कामातून गेली आहे. त्यात आता ती 'निर्ढावलेली निर्लज्ज' होऊन बसली आहे. एका हिंदी दैनिकाने 'आध्यात्मिक पत्रकार' हवा असल्याची जाहिरात सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात छापली. दुर्दशेला वैतागून अशी कारणमिमांसा तरी आपण का करावी? त्या दैनिकाचाही दुर्दशेस तेवढाच हातभार लागलेला आहे. 'गोदी मीडिया' या नावाने वृत्तपत्रांची दुकाने चालतात, त्यात तेही अग्रभागी आहे.

भारतातल्या अध्यात्माचा बाजार कोट्यवधी रुपयांचा आहे. श्री श्री रविशंकर, जग्गी वासुदेव, ब्रह्मकुमारी, मां अमृतानंदमयी देवी, आसारामबापू, मुरारीबापू, रामरहीम, निर्मलबाबा इत्यादी बाबा-महाराज यांच्यासकट धर्म, संस्कृती, सण, परंपरा, मन:शांती अशा विषयांवर भाषणे देऊन भरपूर कमाई करणारे स्त्री-पुरुष गेल्या दहा वर्षांत गावोगावी अवतरले. चित्रवाणी वाहिन्या तर गेली अनेक वर्षे दिवसभर अध्यात्म ओकत असतात. या वाहिन्या म्हणजे अमेरिकेतल्या धर्मप्रचारार्थ सुरू झालेल्या टीव्हीची भ्रष्ट नक्कल घरबसल्या साऱ्या चैनी उपभोगत या अध्यात्माचा ग्राहक वर्ग तयार करणारा एक बाजार. यू-ट्युब आणि तत्सम मंचांवर तर अशा आध्यात्मिक विषयाचा प्रत्यय नित्य येत राहतो.

अशा एका मोठ्या हिंदी दैनिकासारख्या पत्रकारितेत मुरलेल्यांना एकाएकी अध्यात्माची निकड कशी काय जाणवली कळेना. मात्र, राज्यकर्त्यांच्या उकिरड्याची झाकपाक कितीही केली तरी ती थांबेना, म्हणून लक्ष विचलित करायला हा अध्यात्माचा सगुण धांडोळा सादर केला जातो आहे.

जिथे प्रवचने, सप्ताह अन् कीर्तने असतात, तिथे श्रमिक वर्गापेक्षा भरल्या घरचे व भरल्या पोटाचे लोकच जास्त आढळतात. ते प्रवचनकारदेखील भली थोरली रक्कम घेऊनच प्रवचने-सप्ताह पूर्ण करत असतात. त्यांचे साथीदार वादक, गायक, वाचक, ऑडिओ सिस्टिमवाले, वाहने असा तगडा सरंजाम गावोगावी फिरतो. याचा अर्थ काय? चैनीला अध्यात्म असे नाव पडले. अध्यात्म, भक्तीरस यांचा प्रचंड खर्च असतो. आता 'स्पिरिच्युअल जर्नलिस्ट' असे सभोवतालचे भरजरी अन् रंगीबेरंगी वातावरण त्यांच्या बातम्यांत टिपेल का? एखाद्या आध्यात्मिक संयोजनासाठी झालेला खर्च, तो करणारे, जाहिरातदार आणि प्रायोजक यांची नावे, त्यांचे धंदे, त्यांची जीवनचर्या आदी माहिती देईल काय? की फक्त तो बाबा अथवा ती बाई काय बोलले तेवढेच सांगेल? दिसते असे की, जेव्हापासून वृत्तपत्रांत अन् टीव्हीवर अध्यात्माचे वारे वाहू लागले, तशी आध्यात्मिक खर्चाची, चैनीची आणि उधळपट्टीची बाजूच अंधारात जाऊन लपली.

भारतात अध्यात्मावर बोलून प्रचंड कीर्ती, पैसा आणि आंतरराष्ट्रीय अनुयायी जमा करणाऱ्यांवर पत्रकारांनी एकदाही आपली शोधक व चिकित्सक नजर वळवली नाही. एका इंग्रजी वृत्तपत्राने कधी काळी सत्य साईबाबा यांच्या हवेतून घड्याळे वा माळा काढण्याची बिंगफोड केली होती. रजनीश यांच्या काही अनुयायांनीही पुस्तके लिहून रजनीशांचे ढोंग, हाव उघड केली होती.

टीव्हीला नुसते व्याख्यान अथवा शाब्दिक आविष्कार परवडत नाही. त्यामुळे ते हातचलाखी, चमत्कारसदृश कृती आणि अंगात येणे, मनातले ओळखणे, मारझोड करणे, शारीरिक कसरती करणे, अशा गोष्टी करणाऱ्यांकडे खेचला जातो. साहजिकच अशा बाबा आणि बाया खूप प्रसिद्धी मिळवू लागतात. वाहिन्या अशाप्रकारे परजीवी होत प्रेक्षक मिळवू लागतात व त्यातून जाहिराती. म्हणून पत्रकारांना या बतावणीची कल्पना आलेली असूनही त्यांना शंका घेण्याची परवानगी नसते. नाही तर संशय वा शंका नसेल, तर ती व्यक्ती पत्रकार कसली?

अध्यात्माच्या बातम्या देणाऱ्या पत्रकारांपुढे सर्वांत मोठी समस्या ही येत असावी की, पगार किती मागावा? डोके भंजाळून जाईल असे विषय मांडण्याची हातोटी असणारे बुवा, महाराज, बाबा जेवढे बोलतील तेवढे देऊन मोकळे व्हायचे की, त्यांनी केलेल्या प्रवचनाचा अर्थ उलगडून सांगणे हेही काम करायचे? म्हणजे त्यासाठी भरपूर वाचन, श्रवण, विश्लेषण आले. त्याचे वेगळे पैसे मालक देईल काय? अध्यात्माच्या खोल डोहात डुंबायचे आणि तळाशी सापडलेली माणके, रत्ने लोकांना आणून द्यायची म्हटली, तर केवढे सायास करावे लागतील त्या पत्रकाराला? हे प्रयास पत्रकाराला जर त्याच्या प्रपंचापासून दूर नेणारे ठरले, तर बिचाऱ्याला खरोखरंच वैराग्य स्वीकारावे लागेल.

अनेक धर्मांतले अनेक पंथ, उपपंथ, गुरू, तत्त्वज्ञाने, देवदेवता, चमत्कार, साक्षात्कार, संप्रदायात्मक भेदाभेद पाहता एकही पत्रकार आध्यात्माच्या क्षेत्रात मुक्काम ठोकायची शक्यता नाही. व्यक्तिशः त्याला मद्य, धूम्रपान, मांसाहार, द्रव्य, चैन आवडत असेल, तर काय होईल त्याचे? अध्यात्माच्या क्षेत्रात वादविवाद तर होतातच, मारामाऱ्यासुद्धा होतात. आपण सांगतो ते बिनतोड असते असे अहंकारी रूपही येथे आढळते. म्हणूनच खुलासे, स्पष्टीकरण, दिलगिरी यांना मुळीच वाव नसतो या क्षेत्रात. अर्जदारांनो, जरा सांभाळून..!

वर्तमान

मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी काय करावे लागेल!



मिलिंद गड्डमवार
9511215200

कुठल्याही निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीला फार महत्त्व असते. तो लोकशाही व्यवस्थेचा प्राण आहे. या प्राणवायूची शुद्धता कायम राहावी यासाठी काही बंधने ही निवडणूक आयोगाने घालून दिलेली आहेत. यालाच आचारसंहिता म्हणून संबोधले जाते. निवडणुकीत विविध प्रकारची प्रलोभने मतदारांना दाखविली जातात. खरे तर हे नियमबाह्य वर्तन ठरत असते; परंतु निवडणूक आयोग योग्य वेळेत कठोर कारवाई करू शकत नसल्याने फक्त दमदाटी करून, दंडात्मक कारवाई करून मोकळे होत असते, कारण जवळपास सगळेच पक्ष निवडणूक काळात निवडणूक नियमांचे उल्लंघन करीत असतात. यातून कुणीही सुटलेले नाहीत. यासाठी एकमेकांविरोधात आघाडी उघडलेली पाहायला मिळते. मतदानाची टक्केवारी वाढल्यास यांस काही प्रमाणात आळा बसू शकतो.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी फक्त ईव्हीएमवर अवलंबून असता कामा नये. यासाठी विविध पर्यायांचा वापर केला गेला पाहिजे.

यामध्ये ईव्हीएम व्यतिरिक्त बॅलेट पेपर, क्यूआर कोड, ओटीपी इत्यादी पर्यायांचा विचार केला गेला पाहिजे. तसेच मतदान हे कुठूनही करता आले पाहिजे. असे झाले तर मतदानासाठी विशिष्ट तारखेची गरज पडणार नाही. यामुळे मतदान यंत्रणेवरील, निवडणूक आयोगावरील व सुरक्षा यंत्रणेवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे. यामुळे निवडणूक खर्चात मोठी बचत होऊ शकते, याचा अवश्य विचार झाला पाहिजे. आपण आज डिजिटल युगात वावरत असल्याने याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे लावून धरला गेला पाहिजे. मतदानाची प्रक्रिया यामुळे वेगवान आणि मतदारांच्या सोयीनुसार कुठूनही पार पाडता येईल. मतदानासाठी कमीत कमी पंधरा दिवसाची मुदत घालून दिली गेली पाहिजे. यामुळे एकगठ्ठा मतदानाला काही प्रमाणात आळा बसू शकतो. मतदानाची टक्केवारी कमी राहत असल्याने विविध पक्षांचा कल मते खरेदी करण्याकडे वळलेला आहे, याला आळा घालण्यासाठी मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणावर वाढली पाहिजे. मतदानाच्या अधिकाराचा वापर न करणाऱ्यांना याबाबतची विचारणा करून योग्यरित्या दंडीत केले गेले पाहिजे. मतदानाची टक्केवारी वाढल्याशिवाय

लोकशाही व्यवस्थेला चांगले दिवस पाहायला मिळणार नाहीत. निकोप लोकशाही व्यवस्थेसाठी मतदान प्रक्रियेत अनेक बदल करावे लागणार आहेत. कमी मतदान हा लोकशाही व्यवस्थेला लागलेला कलंक आहे. तो कलंक धुवून काढण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढाकार घेतला पाहिजे.

वाचक विचार मंच

राजकीय वातावरण; आपापले संबंध जपा!

सध्या सर्वत्र निवडणुकीचे वातावरण आहे. सर्वत्र या निवडणुकीतील उमेदवारांच्या चर्चा रंगत आहेत. काही विचारवंत काही हितचिंतक आपापल्या उमेदवारांची वाहवा व्हावी म्हणून त्यांच्याच कार्य-कर्तृत्वाचा ढोल पिटत असतात. त्यांच्या चुका झाकत असतात. काही उघड-उघड सर्वांची पोलखोल करतात. तर काही ठराविक उमेदवारांच्या भल्याचे गुण गातात. हे राज्यभर २० नोव्हेंबरपर्यंत असेच चालू राहणार. अशा परिस्थितीत सर्व मतदार, सर्व हितचिंतक यांनी 'मनाचा ब्रेक-उत्तम ब्रेक' हे तत्व आचरणात आणावे. वाद-प्रतिवाद, आरोप-प्रत्यारोप टोकाला जाऊ देऊ नये हे सर्व मर्यादेत ठेवावे. राज्यातील सर्व मतदारांनी या १५ दिवसासाठी आपले सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक संबंधांना ठेच पोहचेल असे वर्तन करू नये. निवडणूक लढणारे उद्या जय-पराजय झाला तरी मांडीला-मांडी लावून बसतील. गळयात-गळा घालून आपल्या समोर फिरतील, पण आपल्या मित्रांशी, परिवाराशी, आपल्या सामाजिक जीवनाशी झालेल्या वाद-विवादाशी आलेले वितुष्ट याची साधी दखलही घेणार नाहीत. त्यामुळे मतदार बंधू-भगिनींनो या १५ दिवसासाठी संयम, सामंजस्य व मनावर नियंत्रण ठेवा, टोकाची भूमिका घेऊन आपले कौटुंबिक, सामाजिक व वैयक्तिक संबंध खराब होऊ न देता ते जपा, बस एवढेच.

धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, जि. संभाजीनगर.
मो. नं.-९४२१३१२२४४

धुम्मस

सुख

--

वाट्टेल तेवढा खर्च करतोय
पैशांची मुळीच कमी नाही
तो उमेदवार म्हणाला डॉक्टरांना
तरीही विजयाची हमी नाही

सत्ता, संपत्ती, प्रसिद्धी
सबकुछ है एकदम बढीया
मी विरोधकांसोबतच
खरेदी केला मीडिया

निवडून येण्यासाठी
सुरू आहेत सर्व खटाटोप
सोशल मीडियातून डागतो
प्रतिपक्षावर आरोपांची तोफ

प्रचंड मेहनत करते
माझी पेड ट्रोल आर्मी
त्यांची एकूणएक पोष्ट घालते
प्रतिस्पर्ध्यांच्या घाव वर्मी

साम, दाम, दंड, भेदासंगे
वापरतो नीती अन् कुटनीती
काय सांगू डॉक्टरसाहेब
मी आटापिटा करतोय किती?

कृपा करा डॉक्टरसाहेब
मी जास्त काही मागत नाही
काहीतरी उपाय सांगा
मुळीच झोप लागत नाही

फक्त शांत झोप हवी
माझी विनंती हीच एक
ह्यासाठी देतो सही केलेला
एकदम कोरा चेक

डॉक्टर अन् नेत्यातला संवाद
गरीब रुग्ण ऐकत होता
नेत्याचा केविलवाणा चेहरा
त्याच्या डोळ्यादेखत होता

तेव्हा त्याची बायको म्हणाली
गरिबीबाबत कशाला कण्हता?
ह्यांच्यापेक्षाही सुखी आहोत
सांगा तुम्ही काय म्हणता?

जेथे टाकतो अंग तेथे
क्षणात झोपी जातो
काबाडकष्ट करणारा गरीब
कुठे झोपेची गोळी घेतो?

जुन्याजाणत्यांनी शिकवण
वाटते आज खरी
लुळयापांगळया श्रीमंतीपेक्षा
धडधाकट गरिबी बरी

विकत घेता येईना
जरी झोप आहे फुकाची
गरिबांना दिली देवा
ही देणगी सुखाची

उपकार केले आम्हावरी
खरंच तू विठूराया
दिला झोपेचा खजिना
नष्ट केली मनातली मोहमाया

ॲड. अनंत खेळकर
अकोला

संवाद

निवडणुकीच्या प्रचारात विखारी असभ्य भाषेचा वापर नको!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतसा प्रचाराला वेग येत आहे. विविध पक्षांच्या देश पातळीवरच्या नेत्यांपासून गावपातळीपर्यंतच्या अनेक नेत्यांनी ठिकठिकाणच्या सभांमधून प्रचाराला सुरुवात केली आहे. मात्र, प्रचाराच्या नावाखाली काही पक्षाच्या नेत्यांकडून आणि उमेदवारांकडून सर्व प्रकारचा ताळतंत्र सोडून हर तऱ्हेचे नकारात्मक मुद्दे प्रचारात आणले जात आहेत. वैयक्तिक पातळीवर जाऊन प्रतिस्पर्धी उमेदवाराची निंदा-नालस्ती, चारित्र्यहनन हे आरोप करून निवडणुकीतील सकारात्मक प्रचाराचे संकेत पायदळी तुडवले जात आहेत. समाजमाध्यमातून विविध पक्षांच्या समर्थकांकडून एकमेकांची उणीदुणी काढण्याबरोबरच खालच्या थराची अर्वाच्य भाषा वापरली जात आहे. विशेष म्हणजे मतदारांना आकर्षित आणि प्रभावित करत असताना राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, वाढती महागाई,

वाढती वाहतूक कोंडी, प्रदूषण इत्यादी अनेक गंभीर समस्यांवर कुणीही बोलायला तयार नाही आणि या मूळ मुद्यांना बगल दिली जात आहे. प्रचाराच्यादरम्यान आपल्याकडून होणाऱ्या असंस्कृत, असभ्य आणि विखारी भाषेचा समाजमनावर काय परिणाम होईल याचेही साधे भानही काही नेत्यांना राहिलेले नाही. येत्या काही दिवसात अशा प्रकारच्या विखारी प्रचाराची हीन पातळी अजून किती खालावणार आहे हे पाहण्याशिवाय मतदारांच्या हातात काहीच नाही.

प्रदीप शंकर मोरे
मो.नं.: ९८७०७७७२७४

गुल्लेर

पाह्यजा आपल्यासाठी...



नरेंद्र इंगळे
9561226572

'हॅलो बबन्या.. काय करुन राह्यला?'

'काई नाई.. घरीच आहो भाऊ.'

'घरी भजे काढून राह्यला काय? आजून दिवाई झालीच नाही काय तुही? आम्ही इकडे रातीचे दिवस करुन राह्यलो.'

'येतो ना भाऊ तुमच्या प्रचाराले.'

'कधी येशीन लेका? आज सात गावाले भेटी देऊन आलो.. रोज पंधरा वीस पोराईची गॅंग असते सोबत.. तू काय माशा मारुन राह्यला घरी?'

'मामा आले होते भाऊबीजले. माह्या लगनाची गोष्ट सुरू होती.'

'मामाले पोरगी आहे काय?'

'मामाची पोरगी चवथीतच हाय.. मामा म्हनते यंदा झालंच पाह्यजे.'

'कशी पोरगी पाह्यजे तुले?'

'पोरीच्या मागं इस्टेट असली पाहिजे.. पोरगी नोकरीवर असली तं फारच सोळाने.. एखांदी नर्स चालते आपल्याले.'

'रिकाम्याले नोकरीवाली कशी भेटीन बे?'

'भेटते ना.. लय लोकाईनं असं जुगाड जमोलं.. बायको डिवटीवर जाते अन् नवरा लेकरं वागोते. आपून त्यात तयार आहो.. म्हनसान तं मीच सैपाक करत जाईल.. भांडे घासीन..'

'पोरीले कबूल असलं पाह्यजे किनी?'

'पोरीले म्हना हा गळी जे म्हटलं ते करते.. आपल्याले काही दारूचा शौक नाही.. बायकोले मारझोड करनार नाही.'

'पोरगी तुव्ह घर पाह्यनार नाही काय? घर खंडारं झालं. वावराचं तास नाही.''घरही बांधू तिच्या पगारावर.'

'अशा तुराट्यावर पराट्यावर पोरीचा बाप कबूल करते काय?'

'त्याले सांगा.. पोरगा निर्व्यसनी आहे.. बस म्हटलं तथी बसते.. पोरीले काहीच तरास देनारा नाही.. पोरीच्या मागं चारपाच एकर वावर असलं तर आपून वावर पाहू शकतो.'

'वखर घेऊन जाशील काय तू?'

'नाई हो.. लागोननं देता येते.. कोन दनके घेईल उनातानात? लगन साधंभादं केलं तरी चालते.. तेवढाच पैसा पुढे कामी येते'

'आरशात तोंड पाह्य आगुदर.. तुले पाहुनच पोरगी भेते.'

'हे दाळी काढून टाकतो मी.. चिकनचोपळा राह्यत जाईन.'

'नोकरीवाल्या पोरीची गोष्टच सोडून दे.. तिच्यावर शिकेल सवरेल टपेल असतात.. तू किती शिकला?'

'शिक्षन बारावीतच सोडलं आपून.'

'काही हरकत नाही. प्रचार करता-करता तुले पोरगी दाखोतो.. लगनाले उशीर लागत नाही. मले एकखेप आमदार त होऊ दे'.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

तीन खाणपट्ट्यांसाठी दुसरा लिलाव १२ नोव्हेंबरपासून

वृत्तसंस्था



पणजी : होंडा, कुर्पे-सुळकर्णे आणि कोडली या तीन खाणपट्ट्यांसाठी जारी करण्यात आलेल्या निविदा उद्या ७ नोव्हेंबरला उघडल्या जाणार आहेत. प्रत्येक ब्लॉकसाठी सर्वाधिक बोली लावलेल्यांसाठी १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान दुसरी लिलाव प्रक्रिया होणार असल्याची माहिती खाण संचालक नारायण गाड यांनी दिली.

तीन खाणपट्ट्यायांच्या लिलावासाठी सरकारने काही दिवसांपूर्वी पात्र कंपन्यांकडून निविदा मागवल्या होत्या. त्यानुसार अनेक कंपन्यांनी निविदा जारी केल्या आहेत. या निविदा ७ नोव्हेंबरला खुल्या होणार आहेत.

‘बटेंगे तो कटेंगे’च्या घोषणेवर अखिलेश यादव यांचा टोमणा!

इंग्रज गेले पण यांना सोडून गेले

लखनौः उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकीवरून राजकीय वातावरण तापले आहे. नेत्यांमध्ये शाब्दिक हल्ले आणि प्रतिहल्ले सुरूच आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या ‘बटेंगे तो कटेंगे’ या विधानावर सपाचे सुप्रीमो सीएम अखिलेश यादव यांनी पुन्हा प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की ‘इंग्रज गेले आणि त्यांना सोडून गेले. भारतीय समाज अशा घोषणांचे समर्थन करणार नाही,’ असे म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून सीएम योगी आपल्या भाषणात ‘बटेंगे तो कटेंगे’ असा उल्लेख करून हिंदू समाजाला एकजूट राहण्याचा संदेश दिला होता. त्यांच्या वक्तव्यानंतर भाजप नेत्यांनी लखनौमध्ये ठिकठिकाणी पोस्टर लावले होते. प्रत्युत्तरादाखल, सपा कार्यकर्त्यांनी एक पोस्टर लावले होते ज्यात ‘ना बंटेंगे ना कटेंगे, मठाधीश सत्ता से हटेंगे, असे म्हटले होते.

राष्ट्राध्यक्षपदाच्या विजयानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचे देशाला संबोधन

देशाचे सर्व प्रश्न सोडवू!

वृत्तसंस्था

न्यूयॉर्क : अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी झालेल्या मतमोजणीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय झाला आहे. निवडणुकीतील विजय निश्चित झाल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकेतील जनतेचे आभार मानले. ‘लोकांना जे अशक्य वाटले ते आम्ही केले. अमेरिकेला पुन्हा एकदा महान बनवू व देशाच्या सर्व समस्या सोडवू असे ट्रम्प म्हणाले. मी अमेरिकन लोकांच्या कुटुंबासाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी लढणार आहे. पुढील ४ वर्षे अमेरिकेसाठी महत्त्वाची आहेत. या दिवसासाठी देवाने माझे प्राण वाचवले, असेही ट्रम्प भावनिक होत म्हणाले. दरम्यान अलास्का, नेवाडा आणि ऍरिझोनामध्ये जिंकणे अविश्वसनीय अनुभव असल्याचा उल्लेख करत अमेरिकेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा विजय असल्याचे ट्रम्प म्हणाले.

मी तुमच्या कुटुंबाच्या भविष्यासाठी लढणार

डोनाल्ड ट्रम्प यांनी स्विंग राज्य मतदारांचे आभार मानले. ‘मी तुमच्या कुटुंबासाठी आणि भविष्यासाठी लढणार असल्याचे त्यांनी सांगितले. आम्हाला स्विंग राज्यातील मतदारांचाही पाठिंबा मिळाला. पुढील चार वर्षे अमेरिकेसाठी सोनेरी असणार आहेत. जनतेने आम्हाला भक्कम जनादेश दिला आहे, असेही डोनाल्ड ट्रम्प म्हणालेत. निवडणूक प्रचारादरम्यान दोन्ही प्रतिस्पर्ध्यांचे संपूर्ण लक्ष ७ स्विंग राज्यांवर होते, ज्यात ट्रम्प आघाडीवर आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनीही यापैकी दोन जिंकले आहेत. आम्ही तुम्हाला सांगतो की जगातील या सर्वात गुंतागुंतीच्या निवडणूक प्रक्रियेत राष्ट्रपती बनण्यासाठी बहुमताचा आकडा २७० आहे, कारण येथे एकूण ५३८ इलेक्टोरल कॉलेज आहेत आणि जिंकण्यासाठी २७० किंवा त्याहून अधिक उमेदवारांची आवश्यकता आहे.

माझ्या मित्रा यशावर आधारित विजयाबद्दल अभिनंदन!

वृत्तसंस्था

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले आहे. डोनाल्ड ट्रम्पसोबतचा फोटो शेअर करताना पीएमने एक्सवर एक पोस्ट लिहिली आहे. त्यांनी लिहिले, ‘माझ्या मित्रा, तुमच्या मागील यशावर आधारित ऐतिहासिक विजयाबद्दल अभिनंदन’. भारत-अमेरिका सर्वसमावेशक जागतिक आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी मी आमच्या सहकार्याचे नूतनीकरण करण्यास उत्सुक आहे.

अमेरिकेच्या राष्ट्राअध्यक्ष निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. यासह रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. यानंतर सोशल मीडियावर ट्रम्प यांच्या विजयाबद्दल अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. आता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले आहे. पीएम मोदींनी लिहिले, माझ्या मित्रा, ऐतिहासिक विजयाबद्दल अभिनंदन, तुम्ही तुमच्या मागील कार्यकाळातील यशावर आधारित, भारत-अमेरिका व्यापक जागतिक आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी आमच्या सहकार्याचे नूतनीकरण करण्यास उत्सूक आहे.

हिंदू मंदिरावरील हल्ल्याबाबत पोलिसांना माहिती होती

वृत्तसंस्था

टोरंटो : टोरंटोच्या एका माजी पोलीस सार्जंटने ब्रॅम्प्टनमधील हिंदू सभा मंदिरावर खलिस्तानी कट्टरपंथीयांनी केलेल्या हल्ल्याबाबत मोठा दावा केला आहे. माजी सार्जंट (डिटेक्टीव्ह) डोनाल्ड बेस्ट, जे आता एक शोध पत्रकार आहेत त्यांनी, कॅनेडियन पोलिसांना माहिती होती की त्यांचा एक अधिकारी हिंदू सभा मंदिरात अतिरेक्यांनी केलेल्या हिंसक निषेधात सामील होता. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या सार्जंटला निलंबित करण्यात आले होते.

डोनाल्ड बेस्टने दावा केला की, या सार्जंटने ऑक्टोबरमध्ये खलिस्तानी कट्टरपंथीयांनी आयोजित केलेल्या निषेधांमध्ये याआधीच भाग घेतला होता’. ते पुढे म्हणाले, हिंदू सभा मंदिरात जे घडले ते कॅनडात गुन्हा आहे, तुम्हाला धार्मिक सभेत व्यत्यय आणण्याची परवानगी नाही. पहिला दगड कोणी फेकला, कोणी कोणाला मारले हे मला माहीत नाही, पण मला माहीत आहे की अनेक खलिस्तानी फुटीरतावादी आंदोलकांनी तेथील काही हिंदूंवर शारीरिक हल्ले केले. मारामारीचे व्हिडिओही आम्ही पाहिले आहेत. हल्लेखोरांमध्ये एक पील पोलीस अधिकारीही दिसत होता. ऑक्टोबरमध्ये खलिस्तानी फुटीरतावाद्यांच्या निदर्शनांदरम्यान हाच अधिकारी दिसला होता, असे त्यांनी यावेळी सांगितले. बेस्टने पुढे बोलताना म्हणालेत ऑक्टोबरच्या मध्यात टोरंटोच्या डाउनटाउनमध्ये निषेध करण्यात आला. मी तोच पोलीस अधिकारी त्या आंदोलनात पाहिला. त्यांच्या हातात फलक आणि झेंडा होता आणि कॅनडात भारतीय वाणिज्य दूतावासावर बंदी घालण्यात यावी’, असे या फलकावर लिहिले होते. या अधिकाऱ्याने खलिस्तानी फुटीरतावादी आंदोलनात भाग घेतला हे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना माहीत नसावे, तरीही त्याच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही यात मला शंका नाही,’ असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

माजी पोलीस अधिकाऱ्याचा दावा

क्षेत्रीय ग्रामीण बँकांचे विलीनीकरण शक्य!

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : सरकारची नजर आता क्षेत्रीय ग्रामीण बँकांवर आहे. देशात सध्या ४३ ग्रामीण बँका असून सरकार त्यांची संख्या २८ वर आणू इच्छित आहे. याकरिता काही बँकांचे अन्य बँकांमध्ये विलीनीकरण करण्याची योजना आहे. यामुळे या बँकांचा खर्च कमी करण्यास आणि भांडवल क्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. सरकारने

४३ वरून २८ वर येणार संख्या

यासंबंधी एक दस्तऐवज तयार केल्याचे समजते. यात ग्रामीण बँकांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव आहे. क्षेत्रीय ग्रामीण बँक छोटे शेतकरी, कृषी मजूर आणि छोट्या व्यावसायिकांना कर्ज देतात; परंतु भांडवल अन् तंत्रज्ञान वापराप्रकरणी त्या पिछाडीवर आहेत.

शहापूरः दापुरमाळच्या ठाकूर पाड्यावरील सोमी नवसू या आजारी असल्यामुळे त्यांना उपचारासाठी त्यांच्या कुटुंबाने दवाखान्यात बांबूच्या झोळीतून ६ किमीची डोंगर पायवाटेवरून पायपीट करत आणले होते. शहापूर पंचायत समितीच्या उदासीन कारभारामुळे हे पाडे आजही रस्त्यापासून वंचित राहिले आहेत.

पाकिस्तानात सैन्यप्रमुखांच्या कार्यकाळात वाढ; शाहबाज सरकारने सैन्यप्रमुखांना केले खूश

वृत्तसंस्था

इस्लामाबाद : पाकिस्तानात सैन्यप्रमुखांचा कार्यकाळ आता ३ वर्षे नव्हे तर ५ वर्षे करण्यात आला आहे. पाकिस्तानच्या सरकारने कायद्यात यासंबंधी दुरुस्ती केली आहे. याचबरोबर वर्तमान सैन्यप्रमुख आसिम मुनीरदेखील आता २०२७ पर्यंत पदावर राहणार आहेत. यापूर्वी त्यांचा कार्यकाळ २०२५ मध्ये संपुष्टात येणार होता.

सैन्यप्रमुखांसोबत पाकिस्तानी सैन्याच्या अन्य वरिष्ठ कमांडर्सचा कार्यकाळही वाढविण्यात आला आहे. संरक्षणमंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी पाकिस्तान आर्मी ॲक्ट १९५२ मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव सभागृहाचे अध्यक्ष अयाज सादिक यांनी संमत झाल्याची घोषणा केली आहे. सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना खूश करण्याकरिता शाहबाज शरीफ सरकारने हे पाऊल उचलल्याचे मानले जत आहे. सिनेटमध्ये हा दुरुस्ती प्रस्ताव संमत करण्यासाठी केवळ १६ मिनिटांचा कालावधी लागला आहे. सैन्यप्रमुखांचा वाढलेला कार्यकाळ हा माजी पंतप्रधान इम्रान खान आणि त्यांच्या पक्षासाठी मोठा झटका असल्याचे मानले जात आहे. इम्रान हे सत्तेवरून हटविण्यामागे सैन्यच असल्याचा आरोप करत असतात. तसेच इम्रान यांनी सैन्यप्रमुख आसिम मुनीर यांच्या विरोधात कारवाईची मागणीही केली आहे. कुठल्याही चर्चेशिवाय संसदेत अशाप्रकारचा प्रस्ताव संमत करणे गैर आहे.

पाकिस्तानातील राजदूतावर मालदीवची कारवाई

वृत्तसंस्था

तालिबानी मुत्सद्याची भेट घेणे भोवले

माले : मालदीवने पाकिस्तानातील स्वतःचा राजदूत मोहम्मद तोहा यांना परत बोलाविण्याचा निर्णय घेतला आहे. तोहा यांनी १ नोव्हेंबर रोजी इस्लामाबादमध्ये तालिबानचे मुत्सद्दी सरदार अहमद शाकिबची भेट घेतली होती. यादरम्यान दोन्ही अधिकाऱ्यांदरम्यान अफगाणिस्तान-मालदीवच्या संबंधांवर चर्चा झाली होती. स्वतःच्या राजदूताला या बैठकीची अनुमती दिली नव्हती. याचमुळे त्याला परत बोलाविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मालदीवच्या विदेश मंत्रालयाने सांगितले आहे.

इस्लामाबाद येथील मालदीवच्या दूतावासाच्या वेबसाइटवरूनही आता तोहा यांचे नाव हटविण्यात आले आहे. तोहा यांना जुलै महिन्यात पाकिस्तानातील राजदूत म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मालदीवच्या सरकारने आता त्यांच्या विरोधात कारवाई केली आहे. तालिबान २०२१ मध्ये अफगाणिस्तानातील सत्तेवर परतला होता. तेव्हापासून आतापर्यंत कुठल्याही देशाने तालिबानच्या राजवटीला मान्यता दिलेली नाही; परंतु ३ वर्षांपासून तालिबानने अनेक देशांसोबत कूटनीतिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. पाकिस्तान, चीन, रशिया आणि इराण यासारख्या अनेक देशांनी अफगाणिस्तानशी राजनयिक संबंधांची सुरुवात केली आहे; परंतु काबुलमधील सर्व पाश्चिमात्य देशांच्या दूतावासाला अद्याप टाळले आहे.

रेती उपशासाठी खाण खात्याकडे २० अर्ज

पणजी : राज्यातील चौदा झोनमधून पारंपरिक आणि अपारंपरिकरित्या रेती उपसा करण्यासाठी आतापर्यंत खाण खात्याकडे सुमारे २० अर्ज आलेले आहेत. अर्ज करण्यासाठी २३ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आलेली आहे. त्यानंतर आलेल्या अर्जांची छाननी करून परवाने देण्यात येतील, अशी माहिती खाण संचालक नारायण गाड यांनी माहिती दिली आहे.

पारंपरिक, अपारंपरिक गटांमध्ये मिळणार परवाने

रेती उपशासाठी निश्चित केलेल्या चौदाही झोनची पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने पाहणी करून मान्यता दिल्यानंतर खाण खात्याकडून रेती उपशासाठी तात्काळ अर्ज मागवले आहे. त्यासाठी एका महिन्याची मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत खात्याकडे सुमारे २० अर्ज आले आहेत, असे गाड म्हणाले. प्रत्येक झोनमध्ये ७० परवाने पारंपरिक आणि ३० टक्के परवाने अपारंपरिक रेती उपशासाठी देण्यात येणार आहेत. त्यामुळे आलेल्या अर्जांची २३ नोव्हेंबर नंतर छाननी केली जाईल आणि पात्र व्यक्तींना परवाने दिले जातील, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, राज्यातील नद्यांमधून रेती उपसा करण्यास न्यायालयाने बंदी घातल्याने रेतीसाठी गोमंतकीयांना शेजारील राज्यांवर अवलंबून राहावे लागले.

दोन बहिणींकडून माजी पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला

घरात घुसून चाकूने केले वार

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : गाडीचा हॉर्न का वाजवतेय असे विचारल्याने दोन तरुणींनी एका माजी पोलीस अधिकाऱ्याच्या घरात घुसून त्यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शनिवारी रात्री पूर्व दिल्लीतील वसुंधरा एनक्लेवमध्ये ही घटना घडली. या दोन्ही तरुणी बहिणी असून पोलिसांनी आता दोघींनाही अटक केली आहे. दोघींनी शनिवारी रात्री उशिरा त्यांच्या सोसायटीत राहणाऱ्या अशोक शर्मा यांच्या फ्लॅटसमोर गाडी उभी करून जोरात हॉर्न वाजवण्यास सुरुवात केली. त्यावेळी अशोक शर्मा यांनी बाहेर येऊन त्यांना हॉर्न का वाजवतेय? अशी विचारणा केली.

पाटणा एम्सच्या संचालकांना पदावरून हटविले

वृत्तसंस्था

पाटणा : बिहारमधील पाटणा एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. गोपाल कृष्ण पाल यांच्या विरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. आरोग्य मंत्रालयाने गोपाल कृष्ण पाल यांना एम्सच्या कार्यकारी संचालक पदावरून हटविले आहे. एम्स गोरखपूरचा अतिरिक्त प्रभार असताना पाल यांनी स्वतःच्या मुलाचे नामांकन पीजीमध्ये करविले होते. याकरिता त्यांनी स्वतःच्या पुत्राचे प्रमाणपत्र नॉन क्रीमि लेयर अंतर्गत तयार करविले होते असा आरोप आहे. आरोग्य मंत्रालयाने एम्स देवघरचे कार्यकारी संचालक डॉक्टर सौरभ वार्ष्णेय यांना ३ महिन्यांसाठी किंवा नव्या संचालकाची नियुक्ती होईपर्यंत एम्स पाटण्याच्या संचालकपदी नियुक्त केले आहे. तर पाल यांच्यावर ही कारवाई दोन सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानंतर केली आहे.

चौकशी समितीने डॉ. गोपाल कृष्ण यांना स्वतःच्या पद आणि अधिकारांचा गैरवापर केल्याप्रकरणी दोषी ठरविले होते. पाल यांचा पुत्र डॉ. ऑरो प्रकाश पालने गोरखपूर एम्सच्या मायक्रोबायोलॉजीमध्ये प्रवेश घेतला होता.

नवी दिल्ली : नायजेरियाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) नुहू रिबाडू हे भारताचे एनएसए अजित डोभाल यांच्या निमंत्रणावरूनच दिल्लीत आले होते. यादरम्यान रिबाडू आणि डोभाल यांनी दहशतवाद, अतिरेकी आणि कट्टरतावाद थांबवण्यासह अनेक मुद्द्यांवर चर्चा केली.

राजस्थानचे माजी मंत्री महेश जोशी यांच्या विरोधात गुन्हा

जयपूर : जलजीवन मिशन घोटाळ्याप्रकरण राजस्थानात भ्रष्टाचार प्रतिबंधक शाखेने (एसीबी) माजी मंत्री अन् काँग्रेसचे नेते महेश जोशी आणि २२ अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हे नोंद केले आहेत. आरोपींमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावेदेखील सामील आहेत. राज्यात सरकारी योजनांमधील भ्रष्टाचार प्रकरणी एसीबीने ही कारवाई केली आहे.

जलजीवन मिशन अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणावर वित्तीय अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झाले होते. याप्रकरणी वित्तीय सल्लागार सुशील शर्मा, तत्कालीन मुख्य अभियंता आर.के. मीणा, दिनेश गोयल यांच्या विरोधातही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. एसीबीकडून गुन्हा नोंदविण्यात आल्याने माजी मंत्री महेश जोशी यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

दरवर्षी बस दुर्घटनांमध्ये १० हजार जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : धोकादायक रस्ता, खराब अवस्थेतील वाहन, अकुशल चालक आणि क्षमतेपेक्षा अधिक भार अशी अनेक कारणे उत्तराखंडच्या अल्मोडा येथील बस दुर्घटनेमागे आहेत. या दुर्घटनेने देशातील रस्ते सुरक्षेच्या मूलभूत त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. देशात बस दुर्घटना होण्याचे प्रमाण वाढले असून यातील जीवितहानीचे प्रमाण धक्कादायक आहे. देशात दरवर्षी बस दुर्घटनांमुळे १० हजार जणांना जीव गमवावा लागत आहे. रस्ते परिवहन मंत्रालयाच्या

रस्ते परिवहन मंत्रालय दुर्घटनांच्या या प्रकरणांना रन ऑफ द रोड श्रेणीत समाविष्ट करते, म्हणजेच कुठलेही वाहन अनियंत्रित होत दुर्घटनाग्रस्त होणे. यात वाहनांना पर्वतीय भागांमध्ये दरीत कोसळण्याच्या घटनाही सामील आहेत. उत्तराखंडमधील दुर्घटना दुःखद आहे. परंतु यामागील कारण पूर्वीसारखीच आहेत.

ओव्हरलोडिंगमुळे वाढते जोखीम

उत्तराखंडमध्ये दुर्घटनाग्रस्त झालेल्या बसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते, यामुळे बस चालविण्यातील संतुलन आणि त्याच्या संवेगावर प्रभाव पडला असणार आहे. प्रत्येक बस सिटिंग कॅपेसिटी म्हणजेच त्यात उपलब्ध आसनांना विचारात घेऊन डिझाइन केली जाते, जितकी अधिक ओव्हरलोडिंग असेल, तितकीच जोखीम अधिक असणार आहे. २०२२ मध्ये बसेसशी संबंधित ५ हजारांहून अधिक दुर्घटना झाल्या, ज्यात १७९८ जणांचा मृत्यू झाला.

उपाययोजना करण्याची गरज

अहवालानुसार चालकांनी वाहनांवरील नियंत्रण गमाविल्याने होणाऱ्या दुर्घटनांचे प्रमाण २०२२ मध्ये ५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढले होते.

मनोवैज्ञानिक समस्या

रस्ते सुरक्षेसाठी काम करणाऱ्या एका संघटनेने मागील वर्षी गुरुग्राममध्ये १०० हून अधिक चालकांचे आरोग्य आणि त्यांच्या मनोवैज्ञानि स्तराची तपासणी केली होती, यात निम्म्याहून अधिक चालक उच्च रक्तदाब अथवा एखाद्या मनोवैज्ञानिक समस्येने ग्रस्त असल्याचे आढळून आले होते.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा...
पुण्यभूमी

चारशे गाड्यांचा ताफा घेऊन नतमस्तक

रणधुमाळी अनिलदादांनी फोडला प्रचाराचा नारळ!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांच्या राजकीय प्रवासात नि:स्वार्थपणे बीडवासियांची सेवा करत आलेले अनिलदादा जगताप हे केवळ बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार नसून अनिलदादा हा बीडवासियांचा झंजावत आहे आणि याच झंजावाताला प्रारंभ झाला असून अनिलदादा जगताप यांनी माजी राज्यमंत्री प्रा. सुरेशजी नवले आणि आपल्या हजारो सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवाराच्या चारशे गाड्यांचा ताफा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर नवगण राजुरी येथे गणपतीचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणाचे आशीर्वाद घेत त्यांच्या चरणी प्रचाराचा नारळ फोडला आणि आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला.

क्षीरसागर मुक्त बीडचा संकल्प:अनिलदादा जगताप

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागरांपासून मला बीडची सुटका करायची आहे आणि बीड विकासाचा कायापालाट करायचा आहे. यासाठी माझ्यावर एकदा विश्वास ठेऊन मला साथ द्या. आपल्या अपेक्षेप्रमाणे मी बीडचा विकास करून दाखवेल. आपण मला मतदानरुपी आशीर्वाद दिला तर घरणेशाहीचे मक्तेदारी संपुष्टात येईल आणि सामान्य घरात सत्ता स्थापित होऊन सामान्यांचे मूलभूत प्रश्न सुटतील. असे आवाहन बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील जनतेला केले.

यानंतर बीड मतदार संघातील राजुरी सर्कल, लिंबागणेश सर्कल, पाली सर्कल, खोकरमोहा जि प, नळावंडी सर्कलमधील गावागावातील देवस्थानाचे दर्शन घेतले. दरम्यान गावाखेड्यातील प्रत्येकाने अनिलदादा आणि सुरेश नवले यांचे गावात आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत अनिलदादांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले तर माता-माऊली आणि भगिनींनी अनिलदादा यांचे औक्षण करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आशीर्वाद दिले. यानंतर अनिलदादांनी गौरक्षनाथ टेकडी या देवस्थानी नतमस्तक होऊन महंत नवनाथ महाराजांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर बीड शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर, बस्वेश्वर स्वामी, संत गाडगे बाबा महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महाराणा प्रताप, माता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेशजी नवले यांनी ठिकठिकाणी उपस्थित असलेल्या आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या, ग्रामस्थांच्या भेटी घेतल्या व विधानसभा निवडणुकीत आम्हाला मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले.

येडेश्वरीचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा

हंगाम:शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव देणार

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील येडेश्वरी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या वर्षाच्या अकराव्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ बीड जिल्ह्याचे खासदार तथा येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन मा. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या शुभहस्ते आणि शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कमिटी सदस्य भाई मोहन गुंड, माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सारिका सोनवणे व सोनवणे परिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.रामेश्वर उबाळे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमा रामेश्वर उबाळे यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.

सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे संचालक प्रा. बाळकृष्ण (बापु) भवर यांनी केले नारायण आबा शिंदे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी ज्येष्ठ नेते नवाब मामु, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब दादा बोराडे, दिलिप आबा गुलभिले, रमेश आबा शिंदे,माजी सभापती अशोक तारळकर, नारायण शिंदे, विलास जोगदंड, बंडू चौधरी, लाला वायबसे, शितल लांडगे, नर्गिस बागवान, राहुल खोडसे तसेच सभासद, शेतकरी, ठेकेदार, कामगार व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते कारखान्याच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते शेतकरी आणि कामगार यांचे हित कारखाना होणार असून शेतकऱ्यांच्या ऊसाला एफआरपी पेक्षा जास्त भाव देणार आहे. तसेच कामगार वर्गांना समाधान कारक पगार दिला जाणार आहे.खा. बजरंग सोनवणे चेअरमन येडेश्व्वरी साखर कारखाना यांनी म्हटले आहे.

राडी जिल्हा परिषद गटात प्रचार!

पडघम:कॉर्नर बैठकांना आले सभेचे स्वरुप

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी मतदारसंघाच्या अंबाजोगाई तालुक्यातील राडी जिल्हा परिषद गटात विविध गावांमध्ये बुधवारी दिवसभर धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंजावात पाहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी बुधवारी सकाळच्या सत्रात राडी, दैठणा मुडेगाव, राडी तांडा येथे कॉर्नर बैठका घेतल्या; तर सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक, तडोळा व अकोला या गावांमध्ये कॉर्नर बैठका घेतल्या. या सर्वच गावांमधून धनंजय मुंडेंना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, प्रत्येक कॉर्नर बैठकीला अगदी जाहीर सभेचे स्वरूप आल्याचे पाहायला मिळाले.

माझी जात आणि धर्म हा विकास आहे. आम्हाला स्वर्गीय मुंडे साहेब व स्वर्गीय पंडित अण्णा यांनी सर्वसमावेशक विकासाचे राजकारण शिकवले. या मातीतील माणसाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी मी माझे आयुष्य समर्पित केले आहे. इथल्या विकासाच्या प्रत्येक विटेमध्ये आणि इथल्या माणसाच्या सुख-दुःखामध्ये मी कायम वाटेकरी आहे. त्यामुळे मांजरापट्ट्यातील या भागातून मला भरभरून मतदान रुपये आशीर्वाद मिळेल असा मला विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यांनी या बैठकांमधून व्यक्त होताना सांगितले. धनंजय मुंडे हे राज्याचे नेतृत्व असून, तुम्ही आता संपूर्ण राज्यात पक्षाच्या व महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात फिरावे. परळी विधानसभा मतदारसंघात तुमचा प्रत्येक कार्यकर्ता हा स्वत:ची निवडणूक समजून लढेल. तुम्ही या निवडणुकीची जबाबदारी आमच्यावर सोडा आणि बिनधास्त सबंध महाराष्ट्रात फिरा, असा विश्वास यावेळी गावातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांना दिला. गावागावात आगमन होताच स्थानिक गावकऱ्यांनी मोठ्या जल्लोषात कुठे बँड लावून, कुठे फटाके फोडून तर कुठे महिला भगिनींच्या हस्ते औक्षण करून धनंजय मुंडे यांचे जोरदार स्वागत केले. गावात आगमन होताच धनंजय मुंडे यांनी त्या त्या गावातील महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादनही केले. सकाळच्या सत्रात मा. आमदार संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, गोविंदराव देशमुख, राजाभाऊ औताडे, विलास काका सोनवणे, बी सी गंगणे, रणजीत लोमटे, गणेश कराड, तानाजी देशमुख, नरसिंह कदम, प्रदीप भैय्या पाटील, गणेश राव जाधव, दत्ताभाऊ गंगणे, उस्मान साहेब शेख, बालासाहेब गंगणे, शरद पाटील, अजितदादा गरड, मेघराज सोमवंशी, मनोज गंगणे, सुभाष बनसोडे, दगडू बनसोडे, विलास पाटील, हनुमंत आप्पा कोळगिरे, सुधाकर काळुंखे, रघुनाथ जोगदंड, हनुमंत गायकवाड, सतीश गंगणे, रावसाहेब आडे, राजाभाऊ लोमटे, गणेश देशमुख, विठ्ठल जाधव, सचिन बनसोडे, वजीर पठाण, कादर खान पठाण, महबूब शेख, प्रभाकर गंगणे, अख्तर जहागीरदार, हाजी

पान २ वर...

जनतेशी जोडलेली नाळ कायम

पत्रकार परिषद : राजेभाऊ फडांनी साधला मुक्त संवाद

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील युवक नेते राजेभाऊ फड यांनी गुरुवारी पत्रकार आणि नागरिकांशी मुक्त संवाद साधला. संपर्क कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी आलेल्या सर्वांशी विविध विषयांवर चर्चा केली. मतदारसंघातील राजकीय घडामोडी, विकासाचे मुद्दे आणि जनतेच्या विविध समस्यांबाबत दिलखुलास चर्चा झाली. मतदारसंघातील जनतेशी जोडल्या गेलेली नाळ कायम ठेवणार असल्याचेही मनोगत त्यांनी व्यक्त केले.

युवक नेते राजेभाऊ फड हे संपर्क कार्यालयात उपस्थित राहून कार्यकर्ते, नागरिक आणि पत्रकार यांच्याशी संवाद साधत आहेत. गुरुवारी त्यांनी आलेल्या सर्वांशी मुक्त संवाद साधत दिलखुलास चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केल्यानंतर राजेभाऊ फड मतदारसंघात सक्रिय आहेत. नागरिकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या समस्या ते जाणून घेत आहेत. विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी पक्षाकडे व्यक्त केली होती. अपक्ष नामनिर्देशन पत्रही त्यांनी दाखल केलेले होते.

पान २ वर...

चिंचोलीमाळीत शिव महापुराण

अध्यात्मिक:कथा,कीर्तन महोत्सवाचे आयोजन!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे स्वानंद सुख निवासी श्री संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी, समाधी सोहळ्यानिमित्त ६ नोव्हेंबरपासून शिव महापुराण कथा, कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चिंचोलीमाळी येथील श्री संत नामदेव महाराज यांच्या मंदिरात श्री क्षेत्र पैठण येथील श्री गुरू दत्तात्रेय संस्थानचे दत्ता महाराज पैठणकर हे शिव महापुराण कथेचे पारायण करणार असून त्यांना तबला वादक आकाश महाराज चव्हाण व विष्णू महाराज राजगुडे हे साथ देणार आहेत. कीर्तन महोत्सवात ६ नोव्हेंबर रोजी भागवताचार्य हरिपंडित महाराज जाधव यांचे, ७ नोव्हेंबर रोजी

दत्ता महाराज पैठणकर यांचे, ८ नोव्हेंबर रोजी भागवताचार्य हनुमंत महाराज गंगथडे यांचे, ९ नोव्हेंबर रोजी विनोदाचार्य माणिक महाराज रेंगे यांचे, १० नोव्हेंबर रोजी संतोष महाराज वनवे यांचे, ११ नोव्हेंबर रोजी दीपक महाराज वादाडे यांचे, १२ नोव्हेंबर रोजी शिव चरित्रकार ज्ञानेश्वर महाराज

पान २ वर...

शिवसेनेकडून कार्यकर्तृत्वाची दखल

उपतालुकाप्रमुखपदी तानाजी धस

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिवसेनेचे हात बळकट करण्यासाठी केजच्या उपतालुकाप्रमुख पदी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत तानाजी धस यांची निवड करण्यात आली. शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे,युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, मराठवाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमा ताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा

पान २ वर...

लोणार येथे शिवसेना प्रचार कार्यालय!

नियोजन:विजयाचा घेतला निर्णय

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीची अनुषंगाने लोणार येथे शिवसेना प्रचार कार्यालय च्या शुभारंभ आमदार डॉ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते व मेकर चे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव यांच्या उपस्थित महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे उपस्थित सहा नोव्हेंबर रोजी करण्यात आले यावेळी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना संबोधित करताना शिवसेना जिल्हाप्रमुख बळीरामजी मापारी म्हणाले की महायुतीचे सर्व सरपंच गावातील पदाधिकारी व कार्यकर्ता यांना आपले

पान २ वर...

कड्यात पिकपला, अपघात चालक जखमी

दुर्घटना: काम रेंगाळल्यामुळे अपघाताची मालिका

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगरहून आष्टी कडे येणाऱ्या पिकप वाहनाला काढा येथील पोलिस चौकीसमोर अपघात झाल्याची घटना गुरुवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात चालक शहादेव सदाशिव आढाव हा किरकोळ जखमी झाला. गेली दोन वर्षापासून नगर- आष्टी काम रस्त्याचे काम रेंगाळल्यामुळे या ठिकाणी सातत्याने अपघाताची मालिका चालूच आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की गुरुवार दिनांक सात रोजी सकाळी आठ वाजेच्या

पान २ वर...

निवड राशपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी संगिता ठोंबरे

व्हिजन, नसलेल्या संगिता ठोंबरेंची बोळवण!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांचा शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश कला आहे. शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी संगीताताई ठोंबरे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीची माहिती कळताच त्यांच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आताषबाजी करून आनंद उत्सव साजरा केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, माजी आमदार संगीताताई ठोंबरे या राष्ट्रवादी शरचंद्र पवार यांच्या पक्षाचे प्रांत अध्यक्ष जयंत पाटील व खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संपर्कात गेल्या अनेक दिवसापासून होत्या व त्या पक्षाकडून उमेदवारी देखील मागत होत्या

परंतु त्यांना अद्यापही राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवारी दिली नाही. ठोंबरे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता परंतु डॉक्टर सेलचे अध्यक्ष नरेंद्र काळे व खासदार सोनवणे यांनी मध्यस्थी करून प्रांत अध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी चर्चा घडवून आणली होती त्यानंतरच माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांनी त्यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला होता. माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले असून दररोज मतदारसंघात मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे व खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संगिताताई ठोंबरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार संगिताताई ठोंबरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात

पान २ वर...

आदित्य शिक्षण संस्थेत खो-खो स्पर्धा

क्रीडा: महाविद्यालया कडून तयारी पूर्ण

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत आंतरमहाविद्यालयीनखो-खो स्पर्धेचा थरार शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी अभियांत्रिकी, कृषी अन्नतंत्र, जैव तंत्र व कृषी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर शुक्रवार ८ नोव्हेंबर रोजी रंगणार आहे. या स्पर्धेत तब्बल ३५ संघ सहभागी झाल्याने या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या होणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. पुरुषोत्तम झंवर यांचे हस्ते होणार आहे. यावेळी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. या स्पर्धा वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत.यावेळी विद्यापीठातील क्रीडा तज्ज्ञ शिक्षक चव्हाण, राठोड, गुळबिले त्यांची उपस्थिती राहणार आहे.

पान २ वर...